SONI TILES Since 1965
AND MARBLE INDUSTRIES
Opp. Munot Estate, Station Road, Ahmednagar. Tel. : (0241) 2418720
Mob. 9372497999
Wholesalers & Manufacturers of - Ceramic Wall & Floor Tiles, Vitrified Tiles, Paving Blocks, Marble & Granite
सोनी टाईल्स अँण्ड मार्बल इंडस्ट्रिज





# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, सोमवार दि. १२.१०.२०२६ | अंक नं. १६४ | वर्ष ६९ वे | दैनिक वर्ष ६३ वे | ANR/022/2018-2020


परदेशी जाणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी
। थर्मल । स्वेटर्स । जर्किन
। ग्लोज । सॉक्स । स्कार्फ
। कॅप्स् एकाच ठिकाणी
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, अ.नगर.
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर.
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

यंदाची सुवर्णखरेदी, भरघोस फायद्याची..
₹999/-* प्रतीग्रॅम मजुरी (22 कॅरेट सर्व दागिन्यांची)
दिवाळी धमाका ऑफर +
₹111/-* चांदी चक्र फ्री (प्रतीग्रॅम सोने खरेदीवर)
सोनेखरेदीवर लकी ड्रॉ कुपनव्दारे 11 एलईडी टिव्ही (43") जिंकण्याची सुसंधी* (प्रती एक ग्रॅम एक लकी कुपन.)
ऑफर कालावधी - 11 ऑक्टोबर 2026 ते 30 डिसेंबर 2026 पर्यंत वैध
चंदुकाका ज्वेल्स™
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड, सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02
Conditions Apply*
बुधवार चालु

खास नवरात्री निमित्ताने तळीच्या साड्यांचा भव्य सेल...तो ही फ्रेश स्टॉक वर.....
नगरमधे खूप साड्यांची दुकाने पाहिली असतील
एकदा महावीर मॉलला भेट देऊन बघा...
स्वस्त म्हणजे नेमक काय असतं....
₹ 999 मधे 4 साड्या त्याच बरोबर सर्व फॅन्सी
रेडिमेड वर 20 ते 50 % डिस्काउंट
रेमंड शुटिंग 299/- रु.मीटर
सर्व वस्तूंची अशी रेंज जी रेग्युलर मार्केटला पहायला मिळणार नाही. आणि तेही होलसेल रेटमध्ये...
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ, मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

यंदाच्या दिवाळीला व नवीन वर्षाला कुठे आहात तुम्ही ?
सिंगा-मले-थाय-दुबई-अबुधाबी-केरळ-अंदामान शिमला-मनाली की वाराणसी, अयोध्या येथे
चलो बॅग भरो निकल पडो..

| | | |
|---|---|---|
| सिंगापुर मलेशिया थायलंड 1,92,000/- १० दिवस | वाराणसी अलाहबाद 58,000/- ८ दिवस | बेस्ट ऑफ अंदमान 74,000/- ७ दिवस |
| हनिमून शिमला मनाली 52,000/- ७ दिवस | नैनिताल मसुरी कॉर्बेट 64,000/- ९ दिवस | दुबई अबुधाबी 88,919/- ५ दिवस |
| राजस्थान मेवाड 53,000/- ८ दिवस | सिक्कीम दार्जिलिंग 80,000/- ९ दिवस | केरळ 35,000/- ६ दिवस |
| बेस्ट ऑफ कश्मिर 56,000/- ६ दिवस | फुकेत क्राबी 96,000/- ४ दिवस | हायलाईटस् ऑफ भुतान 82,000/- ७ दिवस |

राजलक्ष्मी हॉलिडेज्
प्रसाद श्रीकांत मांढरे
98500 63432, 9112384842
ऑफिस नं. २०६, अहमदनगर.

दिवाळी महासेल..
शनिवार दि.१७ ते रविवार दि.१८/१०/२०२६ फक्त दोनच दिवस..
महिलांसाठी : साडी, कुर्ती, लेगीन्स, वन पीस, वेस्टर्न वन पीस, ब्लाऊज भारी, टॉप, ट्राऊजर, कोरियन,खादी व कॉटन पॅण्ट, नाईट पॅण्ट प्लाझो.. रु.२००/-ला काहीही १ व रु.५०० ला ३
पुरुषांसाठी : शर्ट, टी-शर्टस, नाईट पॅण्ट,ट्राउजर, जीन्स २०० रु.काहीही १ व ५०० ला ३
लेडीज : स्मॉल टू 2XL टू पीस, कॉर्ड सेट, नाईट ड्रेस रु.२५०/-
टू पीस 3XL ते 6xL रु.३००/-
* लहान मुला-मुलींचे ड्रेस रु. २०० पासून पुढे
* लहान व मोठ्या मुलींचे भारी पार्टी वेअर ड्रेस व मुलांचे भारी कुर्ता+पायजमा रु.३००/-पासून पुढे
* बेडशीट+पिलो कव्हर
100 x 100 चे ८०० चे रु.४००/-
108 x 108 चे रु.१२०० चे रु.५००/-
वेळ : दुपारी १२ रात्री ८ वाजेपर्यंत
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल मयुरी लेडिज मॉल
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर ९०२८२०११८८

तुम्ही ॲलर्जीने त्रस्त आहात का?
वारंवार होणारी सर्दी, खोकला व दमा विकार
शरीरावर लाल चट्टे येऊन अंग सुजणे व खाज येणे.
ॲलर्जी कमी करण्यासाठी औषधे घ्यावी लागणे.
नेहमी डोळ्यांना खाज सुटणे व डोळे लाल होणे.
कोणत्याही वयातील रुग्णांसाठी वरील व्याधींवर आता खात्रीशीर निदान व उपचारासाठी नगर जिल्ह्यातील एकमेव परिपूर्ण असे "अहिल्यानगर ॲलर्जी टेस्टींग सेंटर"
डॉ. कृष्णा बलदवा
(एम.बी.बी.एस.) ॲलर्जी-त्वचारोग, दमा व मधुमेह तज्ञ
-:नवीन पत्ता:-
जुने वाळिंबे हॉस्पिटल, वर्धमान टायर समोर, बांबु गल्ली, धरती चौक, अहिल्यानगर
Mo. 8390907414 / 9422227414
सोमवार ते शनिवार * वेळ : स. १० ते २:३०सायं. ६ ते ९. पर्यंत
रविवार * वेळ : स. १० ते दु. १ पर्यंत

फ्लेक्स प्रिंटींग
संपर्क : 9403232323

CAMEL SAGO ATUL FOOD PRODUCTS
कॅमल सुपरफाईन शाबुदाणा
उपवासाची कारणे अनेक, शाबुदाणा मात्र एक..
1 किलो | 500 ग्रॅम | 250 ग्रॅम पॅकिंगमध्ये उपलब्ध
कॅमल इन्स्टन्ट शाबुदाणा 1KG पॅकमध्ये उपलब्ध
सर्व किराणा दुकानात उपलब्ध
स्टॉकिस्ट
अशोक बन्सीलाल पारख
कॅमल हाऊस, आडते बाजार, अहिल्यानगर
(0241) 2343896/2341196

मजुरी शानदार, ऑफर धमाकेदार..
आमचा प्रत्येक ग्राहक, लकी ग्राहक..
दसरा-दिवाळी धमाका ऑफर
सर्व दागिन्यांची प्रतिग्रॅम
मजुरी ₹701/-* पासुन



डबल शाईन योजना
10 महिने हप्ते भरा व 11 व्या महिन्यात सुवर्णखरेदी करतांना
दर वाढले तरी फायदा तुमचाच ! सोन्याचे दर आजच निश्चित करा
मजुरीवर मिळवा 50% सूट
सोने खरेदीवर हाँगकाँग ट्रिप जिंकण्याची संधी
ऑफर 11 ऑक्टोबर 2026 ते 15 नोव्हेंबर 2026
सुवर्णसंचय योजना 12=13
12 महिने हप्ते भरा व 13वा हप्ता आमच्याकडून मिळवा व खरेदी करा शुध्द सोने (वेढणी / क्वाईन) किंवा नाविण्यपूर्ण अलंकार.
ही योजना आमच्या अहिल्यानगर / श्रीरामपुर / कडा या तिनही शोरूममध्ये चालु आहे.
शुध्दता, विश्वासार्हता, पारदर्शकता
चंदुकाका ज्वेलर्स
वसंत टॉकिज रोड, अहिल्यानगर 0241-2321512 | बेलापुर रोड, श्रीरामपुर 02422-221512 | धामणगांव रोड, कडा 02441-239538
आमच्याकडे खरेदी केलेल्या सोने-चांदीच्या दागिन्यांची मोडतेवेळी घट धरली जात नाही.




GANDHI HOUSE OF JEWELS
By Gandhi Jewellers (Pabalwala)
मेकिंग चार्जेस सिर्फ़ 7% से शुरू
भव्य ज्वेलरी प्रदर्शन
12, 13 एवं 14 अक्तूबर
होटल आइरिस प्रीमियर, अहिल्यानगर
खूबसूरत आभूषणों का विशेष कलेक्शन।
आइए, हमारे नवीनतम डिज़ाइन्स का अनुभव लें और हर ख़ास मौके के लिए अपने पसंदीदा आभूषण चुनें।
558, सदाशिव पेठ, लक्ष्मी रोड, पुणे | 92255 84990 / 80555 60222

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# एमआयडीसी परिसरात चाकूचा धाक दाखवून रोकड व मोबाईल लांबवले

नगर –एमआयडीसी जवळ असलेल्या साईबन परिसरातील निंबळक बायपास रोडवरील एका निर्जन टेकडीवर बसलेल्या प्रेमीयुगुलाला एका अज्ञात मोटारसायकलस्वाराने चाकूचा धाक दाखवून लुटल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इपोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी तरुण आणि त्यांची मैत्रीण हे २७ सप्टेंबर रोजी रात्री एक वाजण्याच्या सुमारास साईबन परिसरातील निंबळक बायपास रोडवरून साईबनकडे जाणाऱ्या कच्च्या रस्त्यावरील एका छोट्या टेकडीवर बसले होते. यादरम्यान तिथे आलेल्या एका अज्ञात इसमाने फिर्यादीला शिवीगाळ करत लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. आरोपीने त्यांच्याकडे पैशांची मागणी केली आणि त्यानंतर जीवे मारण्याची भीती घालून चाकू गळ्याला लावला.

आरोपीने बळजबरीने फिर्यादीच्या खिशातील पाकीट काढून घेतले. त्या पाकिटात पंधराशे रुपये रोख, आधार कार्ड, बँक ऑफ महाराष्ट्रचे एटीएम कार्ड आणि पॅन कार्ड होते. तसेच त्यांच्याकडील सॅमसंग गॅलक्सी कंपनीचा मोबाईल आणि मैत्रिणीकडील रेडमी कंपनीचा मोबाईल असा एकूण ३६ हजार ५०० रुपयांचा ऐवज आरोपीने लांबवला. हा प्रकार कोणाला सांगितल्यास जिवे मारण्याची धमकी देऊन आरोपी पसार झाला. याप्रकरणी एमआयडीसी पोलीस अधिक तपास करत आहेत.

# नगर शहरात झालेल्या तीन खून प्रकरणी विशेष सरकारी वकीलांची नियुक्ती करून ‘एसआयटी’ स्थापन करावी : आमदार संग्राम जगताप यांची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

नगर – शहरात गेल्या काही दिवसांमध्ये एकामागोमाग झालेल्या तीन खून प्रकरणांचा तपास निष्पक्ष व पारदर्शीपणे लागावा, हत्या झालेल्या कुटुंबियांना लवकरात लवकर न्याय मिळावा व गुन्हेगारांना कडक शासन व्हावे, यासाठी सदर प्रकरणी अनुभवी व सक्षम विशेष सरकारी वकीलांची नियुक्ती करून एसआयटीची स्थापन करावी, या मागणीचे निवेदन आ.संग्राम जगताप यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

आ.जगताप यांनी मुख्यमंत्री फडणवीस यांची मुंबईत भेट घेऊन नगरमध्ये झालेल्या धीरज परदेशी हत्याकांड, दीपक वाघस्कर व रवींद्र चव्हाण यांच्या हत्या प्रकरणांचा तपास निष्पक्ष व पारदर्शीपणे लागावा यासाठी चर्चा करून मागण्यांचे निवेदन दिले.

निवेदनात नमूद केले आहे की, नगर शहरात ७ ऑगस्ट रोजी झालेल्या धीरज परदेशी या युवकाच्या हत्याकांडानंतर रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. त्यावेळी आपण स्वतः दुरध्वनीवरून संभाषण करून धीरज परदेशी कुटुंबियाला न्याय मिळवून देऊ असे आश्वासित केले होते. सदर प्रकरणी न्यायालयीन प्रक्रिया प्रभावीपणे पार पडावी, घटनेशी संबंधित सर्व पुरावे व साक्षीदारांच्या जबाबांचा योग्य विचार व्हावा आणि पीडित कुटुंबीयांची बाजू न्यायालयासमोर सक्षमपणे मांडली जावी, यासाठी वरिष्ठ व अनुभवी विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती होणे आवश्यक आहे. तसेच संबंधित प्रकरणाचा तपास, उपलब्ध पुरावे आणि न्यायालयीन कामकाज यांचा नियमानुसार आढावा घेऊन दोषींविरुद्ध कायद्यानुसार कडक कारवाई होण्यासाठी संबंधित विभागास आवश्यक निर्देश द्यावेत, अशी मागणी आ.जगताप यांनी केली आहे.


आ.संग्राम जगताप यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन शहरात गेल्या काही दिवसांमध्ये झालेल्या तीन खून प्रकरणांबाबत विविध मागण्यांचे निवेदन दिले.

आ.संग्राम जगताप यांनी २३ ऑगस्ट रोजी भिंगारच्या गणेश विसर्जन मिरवणुकी दरम्यान दीपक वाघस्कर यांच्या मृत्यू घटने बाबतही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन दिले असून त्यात नमूद केले की, या प्रकरणातील सत्य परिस्थिती समोर येऊन वाघस्कर कुटुंबीयांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सदर घटनेची पार्श्वभूमी, घटनाक्रम, प्रत्यक्षदर्शींचे जबाब, उपलब्ध व्हिडिओ चित्रण, सीसीटीव्ही फुटेज व इतर संबंधित पुरावे यांची सखोल तपासणी होणे गरजेचे आहे. या प्रकरणाची चौकशी पारदर्शक व निष्पक्ष पद्धतीने झाल्यास घटनेमागील वस्तुस्थिती स्पष्ट होण्यास मदत होईल. त्यामुळे या घटनेप्रकरणी विशेष तपास पथकाची स्थापना करून सखोल, निष्पक्ष व पारदर्शक चौकशी करण्याचे निर्देश संबंधित यंत्रणेला द्यावेत. तसेच भिंगार गणेशोत्सव विसर्जन मिरवणूक दरम्यान पोलिसांच्या लाठीमारामुळे शेकडो गणेशभक्त जखमी झाले आहेत. हा लाठीमार कोणाच्या आदेशाने व का करण्यात आला ? याची सखोल चौकशी होणे आवश्यक आहे. या लाठीमार मुळेच दीपक वाघस्कर यांचा मृत्यू झाला असल्याचा संशय नागरिकांमध्ये व्यक्त केला जात आहे. त्यामुळे या संपूर्ण प्रकरणाची विशेष तपास पथकामार्फतच करण्यात यावी.

नुकत्याच झालेल्या रविंद्र चव्हाण खून प्रकरणी दिलेल्या निवेदनात आ.जगताप यांनी नमूद केले आहे की, अहिल्यानगर शहरात झालेल्या एका किरकोळ घटनेत रविंद्र चव्हाण यांची हत्या झाल्याची घटना अत्यंत दुर्दैवी व गंभीर आहे. या घटनेमुळे त्यांच्या कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला असून, त्यांना न्याय मिळणे अत्यंत आवश्यक आहे. सदर प्रकरणात न्यायालयीन प्रक्रिया प्रभावीपणे पार पडावी, उपलब्ध पुरावे व साक्षीदारांच्या जबाबांच्या आधारे पीडित कुटुंबीयांची बाजू न्यायालयासमोर सक्षमपणे मांडली जावी आणि दोषींवर कायद्यानुसार योग्य ती कारवाई व्हावी, यासाठी अनुभवी व सक्षम विशेष सरकारी वकिलाची नियुक्ती होणे आवश्यक आहे.

नगर शहरात घडलेल्या तीन खून प्रकरणी आपण स्वतः वैयक्तिक लक्ष घालून सदर तिन्ही कुटुंबियांना न्याय मिळवून देण्यासाठी गुन्हेगारांवर जरब बसवणे गरजेचे आहे. जेणे करून समाजात कायद्याचा धाक राहील व अशा घटना वारंवार होणार नाहीत, आशी मागणी केली आहे.

# पाईपलाईन रोड ते इस्कॉन मंदिर रस्त्यावरील पूल धोकादायक; विद्यार्थी, वाहनचालकांना त्रास

नगर – अहिल्यानगर शहरात शासनाच्या निधीतून कोट्यवधी रुपयांची रस्त्यांची कामे होत आहेत. सावेडी उपनगरातील अनेक वसाहतीत सिमेंट कॉंक्रीटचे रस्ते तयार करण्यात आले आहेत. या रस्त्यावर असलेल्या ओढ्यांवरील पुलाच्या कामांचा विसर पडला आहे. प्रभाग क्रमांक एक मधील पाईपलाईन रोडवरून वाणीनगर कमानी पासून इस्कॉन मंदिराकडे जाणाऱ्या रस्त्यावर असलेल्या ओढ्याची दुरुस्ती रखडली आहे. ओढ्यातील रस्ता गायब झाला असून ओबडधोबड मुरुमाच्या मातीवरून वाहन चालवताना नागरिकांना कसरत करावी लागत आहे. ओढ्याला संरक्षक कठडेही नसल्याने हा प्रवास धोकादायक बनला आहे.



गावडे मळा परिसरातील इस्कॉन मंदिर परिसरात मोठी लोकवस्ती आहे. नवनवीन वसाहती वेगाने वाढत आहेत. या भागात अनेक अंतर्गत रस्ते कॉंक्रिटचे झाल्याने चांगली सोय झाली आहे. या भागातून दररोज हजारो वाहने येजा करतात. शालेय विद्यार्थीही सायकलवरून येजा करतात. या सर्वांना या ओढ्यावरून प्रवास करताना त्रास सहन करावा लागतो. महानगरपालिकेच्या निवडणुकीवेळी मतदानाच्या आदल्या दिवशी या ओढ्यावरील रस्त्यावर मुरुम टाकून तात्पुरती डागडुजी करण्यात आली. रस्ता थोडा बरा झाला. पण अवघ्या काही दिवसांत हा मुरुमाचा थर वाहून गेला. आता सर्व ओबडधोबड, खराब रस्ता असल्याने वाहनचालकांचे हाल होत आहेत. इतर संपूर्ण रस्ता सिमेंटचा असताना या ओढ्यावरील पूल त्रासदायक ठरत आहे. रात्रीच्या वेळी अंधारात या पुलावरून येजा करणे धोकादायक ठरत आहे.

शालेय विद्यार्थी, वाहनचालक, ज्येष्ठ नागरिक सर्वच या दुरवस्थेमुळे त्रस्त झाले आहेत. पावसाळ्यात ओढ्याला जास्त पाणी येऊन पूल पाण्याखाली जातो. यावर्षी पावसाने दडी मारल्याने पूरस्थिती उद्‌भवली नसली तरी पुलावरील रस्त्याची दुरवस्था कायम आहे. अवघ्या साठ सत्तर मीटर लांबीच्या या पुलाकडे महानगरपालिकेचे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. त्यामुळे इतर रस्ता चकचकीत असतानाही त्याचा पूर्ण आनंद नागरिकांना मिळत नाही इस्कॉन मंदिरात शहरातून नित्यनेमाने येणाऱ्या भाविकांनाही या गैरसोयीचा सामना करावा लागतो. मूलभूत सुविधा देण्यावर एकीकडे कोट्यवधी रुपयांचा निधी खर्च होत आहे. त्यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला आहे. त्याचवेळी ओढ्या नाल्यांवरील पुलांची दुरुस्ती, मजबूतीकरण अशा कामांकडे दुर्लक्ष होत आहे. सदर पूल तातडीने वाहतुकीसाठी योग्य करावा अशी मागणी स्थानिक नागरिकांनी केली आहे.

# मेंढपाळावर जीवघेणा हल्ला

नगर – नगर तालुक्यातील बाबुर्डी बेंद शिवार येथील एच.पी. पेट्रोल पंपाजवळ मेंढ्या चारण्यासाठी थांबलेल्या एका मेंढपाळावर आणि त्याच्या साथीदारांवर ९ जणांच्या टोळक्याने प्राणघातक हल्ला केल्याची घटना समोर आली आहे. याप्रकरणी नगर तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी बंडू बाबू महारनोर (वय २८, रा. गुळुंचे, कनोरवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे) हे आपल्या मेंढ्या चारत असताना बाबुर्डी बेंद शिवार येथे मुक्कामासाठी थांबले होते. त्या वेळी आरोपींनी तिथे येऊन ही जागा आमची आहे, येथे वाडा करून मेंढ्या कशा काय बसवल्या, आम्हाला विचारले का नाही? असे म्हणून हुज्जत घातली.

वाद वाढल्यानंतर आरोपींपैकी एकाने लोखंडी कुऱ्हाडीच्या दांड्याने आणि दगडाने मारहाण करून गंभीर दुखापत केली. तसेच इतर साथीदारांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करत शिवीगाळ केली. एवढ्यावरच न थांबता आरोपींनी दोन मेंढ्याची पिल्ले पायाखाली तुडवून मारली आणि एका मोठ्या मेंढीस गंभीर जखमी केले. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून, या प्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहायक फौजदार गुंजाळ करत आहेत.

## कुसुमबाई भटेवडा यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – महावीरनगर सावेडी येथील रहिवासी श्रीमती कुसुमबाई माणकचंद भटेवडा (वय ८३) यांचे ११ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे १ मुलगा, २ मुली, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मनोज भटेवडा यांच्या त्या मातोश्री तर संतोष भटेवडा यांच्या चुलती होत.



## एकनाथ कोकाटे यांचे अल्प आजाराने निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी एकनाथ किसन कोकाटे (वय ७५) यांचे १२ ऑक्टोबर रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे पत्नी, २ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. मायाजी व संजय कोकाटे यांचे ते वडील होत.

## बबईबाई येठेकर यांचे निधन

वाळकी – अहिल्यानगर तालुक्यातील गुंडेगाव येथील रहिवासी बबईबाई सूर्यभान येठेकर (वय ७२) यांचे निधन झाले. त्या अहिल्यानगर येथील न्यू आर्टस्, कॉमर्स कॉलेजचे प्राध्यापक डॉ. नवनाथ येठेकर यांच्या मातोश्री होत. त्यांनी एकत्रित कुटुबांमध्ये राहुन आदर्श पत्नी, आदर्श माता, आदर्श गृहिणी, आदर्श अन्नपूर्णा, स्वच्छता आणि नीटनेटकेपणा जपत कुटुंबवत्सल स्त्री आणि मुलांविषयी अभिमान व सर्वांशी सन्मानाने वागणारी माता म्हणून त्यांनी नावलौकिक मिळवला होता. त्यांच्या पश्चात मुलगा, सून, नातवंडे असा परिवार आहे.



## भाऊसाहेब बोरुडे यांचे निधन

नगर – चिचोंडी पाटील येथील रहिवासी भाऊसाहेब भानुदास बोरुडे (वय ५५) यांचे १० ऑक्टोबर रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर चिचोंडी पाटील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, जावई, नातवंडे असा परिवार आहे. बाळासाहेब बोरुडे यांचे ते वडील होत.



## गजराबाई पठारे यांचे वृद्धापकाळाने निधन

नगर – रुई रोड, वाळवणे (ता.पारनेर) येथील गजराबाई किसन पठारे (वय ९५) यांचे ११ ऑक्टोबर रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर वाळवणे स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



त्यांच्या मागे १ मुलगा, २ सुना, नातवंडे असा परिवार आहे. भरत किसन पठारे यांच्या त्या मातोश्री होत.

# पंजाब येथे झालेल्या ‘आंतरराज्यीय फेडरेशन चषक कॉर्फबॉल स्पर्धेत’ नगर येथील दिशान गांधीच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र संघाला विजेतेपद

नगर – पंजाबमधील लव्हली युनिव्हर्सिटीत झालेल्या आंतरराज्यीय फेडरेशन चषक स्पर्धेत अहिल्यानगरचा पुत्र दिशान किशोर गांधीच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्याच्या संघाने गोल्ड मेडल मिळवत विजेतेपद पटकावले आहे. नुकत्याच दिल्ली येथे झालेल्या पहिल्यावाहिल्या कॉर्फबॉल लीग स्पर्धेतही दिशानने अप्रतिम कामगिरी करत दिल्ली धुरंधर संघाला विजेतेपद मिळवून देण्यात सिंहाचा वाटा उचलला होता. यानंतर लगेचच त्याने पुन्हा एकदा अष्टपैलू खेळ करत महाराष्ट्राच्या संघाला विजेतेपद मिळवून दिले. या कामगिरीने त्याच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला आहे.






लव्हली युनिव्हर्सिटीतील इनडोअर स्टेडियममध्ये तीन दिवस रंगलेल्या बाद फेरी स्पर्धेत दिशान गांधी याने महाराष्ट्राच्या संघाचे नेतृत्व करत हरियाणा, राजस्थान, केरळ, पंजाब या संघांचा पराभव करत अंतिम सामन्यात स्थान मिळवले. अंतिम सामन्यातही महाराष्ट्राने उत्कृष्ट खेळ करत जम्मू काश्मीर संघाला धूळ चारत विजेतेपद पटकावले.

दिशानने आपल्या नेतृत्व कौशल्याने टिममधील सहकारी खेळाडूंना प्रोत्साहन दिले. अहिल्यानगर शहरातील स्तवन प्रभू, भक्ती परदेशी, पलक राठोड, प्राची काळे आणि अकोल्याचा सार्थक उदमले यांचाही महाराष्ट्राच्या संघात समावेश होता. कॉर्फबॉल लीग स्पर्धा आणि आंतरराज्य फेडरेशन चषक स्पर्धेत विजेतेपद असा दुग्धशर्करा योग या कामगिरीने जुळून आला आहे. कॉर्फबॉल खेळात अहिल्यानगरचे नाव राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोचले आहे. राष्ट्रीय पातळीवरील विजेतेपदाबद्दल महाराष्ट्र कॉर्फबॉल असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण मानवतकर, प्रा. गौतम जाधव यांनी संघाचे अभिनंदन केले आहे. दिशान व सहकारी खेळाडू लवकरच अहिल्यानगर शहरात परतणार आहेत.

# शहरातील सुशोभीकरणाच्या शिल्पांवर जाहिरातींचा विळखा

### महापालिकेच्या कारवाईच्या सूचनांकडे दुर्लक्ष; चौथरे झाले खासगी जाहिरातींचे फलक

नगर – अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध चौकांमध्ये सुशोभीकरणांतर्गत आकर्षक शिल्पे उभारण्यात आली आहेत. मात्र, या शिल्पांसाठी बांधण्यात आलेल्या चौथाऱ्यांवर खासगी क्लासेस, शिकवणी वर्ग आणि विविध आस्थापनांच्या जाहिराती बिनदिक्कतपणे लावण्यात येत असल्याचे चित्र समोर आले आहे. त्यामुळे शहराच्या सौंदर्यकरणासाठी उभारलेल्या शिल्पांचे विद्रूपीकरण होत असून, महापालिकेच्या कारवाईच्या सूचनांनाही संबंधित आस्थापना जुमानत नसल्याचे दिसून येत आहे.



रेवेन्यू अ‍ॅण्ड रजिस्ट्रेशन डिपार्टमेंट जुन्या कलेक्टर कचेरी समोरील महानगरपालिकेतर्फे उभारण्यात आलेले शिल्प जाहिरातीच्या विळाख्यात. (छायाचित्र – लोकेश बर्वे)

महानगरपालिकेने शहरातील विविध चौकांचे सुशोभीकरण करण्यासाठी महानगरपालिकेच्या वतीने पुढाकार घेतला आहे. या उपक्रमांतर्गत उभारण्यात आलेली शिल्पे शहराच्या सौंदर्यात भर घालण्याबरोबरच नागरिकांसाठी आकर्षणाचे केंद्र ठरत आहेत. मात्र, काही खासगी आस्थापनांकडून या शिल्पांच्या चौथाऱ्यांचा जाहिरातींसाठी वापर केला जात आहे. शिल्पांच्या पायथ्याशी पोस्टर्स आणि जाहिरात फलक लावल्यामुळे सुशोभीकरणाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात आहे. विशेष म्हणजे, अशा अनधिकृत जाहिरातींवर कारवाई करण्याबाबत महानगरपालिकेकडून सूचना देण्यात आल्याचे सांगितले जात असतानाही जाहिराती लावण्याचे प्रकार सुरूच असल्याचे दिसून येते. त्यामुळे संबंधित विभागाच्या कारवाईबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

शहरातील सार्वजनिक ठिकाणे, चौक आणि सुशोभीकरणासाठी उभारलेल्या वास्तूंचा वापर खासगी जाहिरातींसाठी करण्यावर नियंत्रण ठेवण्याची जबाबदारी महानगरपालिकेची आहे. मात्र, प्रत्यक्षात शिल्पांच्या चौथाऱ्यांवर जाहिरातींचे थर साचत असताना त्याकडे महानगरपालिकेचे दुर्लक्ष होत असल्याची नगरकरांची भावना आहे.

शहराचे सौंदर्य जपण्यासाठी महापालिका शिल्पांवरील अनधिकृत जाहिराती तातडीने हटवणार का? तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या संबंधित आस्थापनांवर दंडात्मक कारवाई करणार का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. शहराच्या सुशोभीकरणाचा उद्देश साध्य करण्यासाठी महापालिकेने केवळ सूचना न देता प्रत्यक्ष कारवाई करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# नगरमध्ये १५ ऑक्टोबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबीर

नगर – पुण्यातील रूबी हॉल क्लिनिक येथे हृदयरोगावरील अत्याधुनिक व जागतिक दर्जाच्या उपचार सुविधा उपलब्ध आहेत. राज्यातील रूग्णांना या सुविधांचा लाभ होत असतो. याशिवाय जास्तीत जास्त रूग्णांना या सेवेचा लाभ मिळण्यासाठी १५ ऑक्टोबर रोजी मोफत हृदयरोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. नगर शहरात तारकपूर येथील साई एशियन हॉस्पिटलमध्ये दुपारी २.३० ते ३.३० यावेळेत तपासणी शिबिर होईल. या शिबिरात ग्रँट मेडिकल फौंडेशन, रुबी हॉल क्लिनिक, पुणे येथील हृदयरोग तज्ज्ञ रूग्णांची तपासणी व मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती सिनियर मॅनेजर संतोष दसासे यांनी दिली. नगरमध्ये दर महिन्याला तिसऱ्या गुरूवारी कार्डियाक ओपीडी सेवा दिली जाते.

सध्याच्या काळात हृदयविकारावर अधिक परिणामकारक उपचार शक्य झाले असून याठिकाणी हृदयरोगतज्ज्ञ डॉक्टर रूग्ण तपासणी व उपचारांसाठी उपलब्ध असतात. छातीत दुखणे, दम लागणे, अस्वस्थ वाटणे अशी लक्षणे असलेल्या रूग्णांनी या शिबिरात तपासणी करून घ्यावी. शिबिरासाठी ०२४१–२३२५६४८ या क्रमांकावर नाव नोंदणी करावी असे आवाहन करण्यात आले आहे.

# स्नेहबंध फौंडेशनच्या वतीने जिल्हास्तरीय १२ वर्षाखालील मुला मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धा

नगर – स्नेहबंध सोशल फौंडेशनच्या वतीने नवरात्र उत्सवानिमित्त जिल्हास्तरीय १२ वर्षाखालील मुला–मुलींसाठी फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ज्यांना सहभाग घ्यावयाचा आहे, त्यांनी आपले पूर्ण नाव, वय, पत्ता व मोबाईल नंबर २० ऑक्टोबर पर्यंत ८७ ९३ १९ १९ १९ या क्रमांकावर नुकताच मोबाईलवर काढलेला फोटो पाठवावा. पहिला गट वय १ ते ५ वर्षे व दुसरा गट ६ ते १२ वर्षे असा असेल. (फोटो जुना व फोटो कॅमेरा मधील फोटो चालणार नाही.)



अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली समिती परीक्षण करून दोन्ही गटातील पहिल्या ३ / ३ स्पर्धकांना गौरवण्यात येणार आहे. स्पर्धेत प्रवेश मोफत आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, २७२३, गंजबाजार, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### आरोग्यासाठी काय चांगले? भाकरी, पोळी की भात?

आपल्या महाराष्ट्राच्या जेवणात भाकरी, चपाती आणि भात हे तिन्ही मुख्य आहेत पण तिघांचे गुणधर्म वेगळे आहेत. ज्वारी आणि बाजरीच्या भाकरीमध्ये फायबरचे प्रमाण सर्वात जास्त असते त्यामुळे पोट जास्त वेळ भरलेले राहते आणि वजन नियंत्रणात राहण्यास मदत होते. तसेच भाकरी ग्लूटेन फ्री असल्यामुळे ज्यांना गव्हाची ॲलर्जी आहे त्यांच्यासाठी ती उत्तम पर्याय आहे आणि यातील लोह व कॅल्शियममुळे हाडे मजबूत होतात व अशक्तपणा कमी होतो. गव्हाच्या चपातीमध्ये प्रोटीन आणि कार्बोहायड्रेट संतुलित प्रमाणात असतात त्यामुळे रोजच्या कामासाठी लागणारी ऊर्जा ती सहज देते. गहू पचायला मध्यम असतो त्यामुळे ज्यांना दिवसभर काम करायचे असते त्यांच्यासाठी दोन चपात्या हा योग्य आहार ठरतो. मात्र अतिरिक्त वजन असणाऱ्या लोकांनी मैद्यासारख्या बारीक गव्हाऐवजी जाडसर गव्हाची चपाती खाल्ली तर अधिक फायदा होतो. भात हा पचायला तिन्हींमध्ये सर्वात हलका असतो त्यामुळे लहान मुले, वयस्कर व्यक्ती आणि आजारी व्यक्तीसाठी भात उत्तम आहे. भातामध्ये पोटॅशियम आणि बी जीवनसत्व असते पण पॉलिश केलेल्या पांढऱ्या भातामध्ये फायबर कमी होते आणि त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स जास्त असल्यामुळे मधुमेही रुग्णांनी तो कमी प्रमाणात खावा. जर तुम्हाला वजन कमी करायचे असेल तर भाकरीला पहिला प्राधान्य द्या, रोजच्या संतुलित आहारासाठी चपाती योग्य आहे आणि रात्री हलके जेवण म्हणून किंवा पोटाच्या तक्रारी असताना भात हा चांगला पर्याय आहे. उत्तम आरोग्यासाठी तिन्हींचा आलटून पालटून वापर करणे हाच खरा संतुलित उपाय आहे.

## पाककला

### कुणाफा

**साहित्य :** कुणाफा सेवई (कडायफ) २०० ग्रॅम, तूप ४ चमचे वितळलेले, मोझरेला चीज किसलेले १५० ग्रॅम, साखर १ कप, पाणी १ कप, लिंबू रस अर्धा चमचा, वेलची पूड पाव चमचा, पिस्ता, बदाम सजावटीसाठी

**कृती :** आधी पाक बनवा १ कप साखर + १ कप पाणी उकळवा. थोडा घट्ट झाला की लिंबू रस आणि वेलची पूड टाका. थंड करा.कुणाफा सेवई हाताने मोकळी करा, त्यात वितळलेले तूप टाकून मिक्स करा.एका पॅनला तूप लावा. अर्धी सेवई खाली थापून दाबा. त्यावर सर्व चीज समान पसरवा वर उरलेली सेवई टाकून परत हलके दाबा गॅसवर मंद आचेवर १५-२० मिनिटे झाकण ठेवून खालून सोनेरी होईपर्यंत भाजा. किंवा १८० डिग्री वर ओव्हनमध्ये २० मिनिटे बेक करा. गरम असतानाच त्यावर थंड पाक ओता. ५ मिनिटे मुरू द्या. वरून पिस्ता, बदाम टाकून गरमागरम तुकडे करून सर्व्ह करा.

## वास्तू

### कापड दुकान असेल तर...

❋ महाग आणि नवीन डिझाईनचे कपडे नेहमी वायव्य (उत्तर-पश्चिम) दिशेला लावा, तिथून कपडे लवकर विकले जातात.

❋ हलके आणि रोजच्या वापराचे कपडे दक्षिण दिशेला ठेवू शकता.

❋ काळ्या रंगाचे कपडे जास्त प्रमाणात दक्षिण दिशेलाच लावा.

❋ ट्रायल रूम नेहमी पश्चिम किंवा वायव्य दिशेला बनवा.

❋ ट्रायल रूममध्ये आरसा उत्तर किंवा पूर्व भिंतीवर असावा.

❋ मुख्य दरवाजासमोर थेट मोठा आरसा कधीही लावू नका, याने आलेली लक्ष्मी परत जाते.

## सौंदर्य

❋ तुमच्या त्वचेनुसार पॅक लावा. तेलकट त्वचेसाठी मुलतानी माती + गुलाबपाणी, कोरड्या त्वचेसाठी बेसन + दही + हळद, सावळ्या त्वचेसाठी बटाट्याचा रस + टोमॅटो रस. १५ मिनिटे ठेवून थंड पाण्याने धुवा.

❋ गरम पाण्यात रुमाल बुडवून २ मिनिटे चेहऱ्यावर ठेवा किंवा वाफ घ्या. याने छिद्रे उघडतील.

❋ कच्चे दूध कापसाने चेहऱ्याला लावा आणि २ मिनिटे मसाज करून धुवून टाका.

## सल्ला

तळलेले पदार्थ जास्त तेलकट होऊ नयेत म्हणून पेपरवर काढल्यावर त्यावर थोडे मीठ शिंपडा.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

मंगळवार, दि. १३ ऑक्टोबर २०२६

**सप्तरात्रोत्सवारंभ, शके १९४८ पराभवनामसंवत्सर, आश्विन शुक्लपक्ष, विशाखा २५।४३, सूर्योदय ०६ वा. २९ मि. सूर्यास्त ०६ वा. ३२ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** आर्थिक लाभ होण्याची शक्यता आहे.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी तणाव जाणवेल.

**मिथुन :** प्रवास योग आहे. नवीन ओळखी होतील.

**कर्क :** पैशांची आवक वाढेल. कुटुंबात मतभेद संभवतात.

**सिंह :** मान-सन्मान वाढेल. खर्चात वाढ होईल.

**कन्या :** नोकरीत बदलाचे संकेत आहेत. आरोग्याकडे लक्ष द्यावे लागेल.

**तूळ :** प्रेम संबंधात गोडवा राहील. व्यवसायात फायदा होईल.

**वृश्चिक :** अडकलेली कामे पूर्ण होतील. मानसिक थकवा जाणवेल.

**धनु :** भाग्याची साथ मिळेल. स्पर्धा परीक्षेत यश मिळेल.

**मकर :** जमिनीच्या व्यवहारात लाभ होईल. वडिलधाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

**कुंभ :** मेहनतीचे फळ मिळेल. संध्याकाळी शुभ वार्ता मिळेल.

**मीन :** कलाक्षेत्रात प्रगती होईल. खर्चावर नियंत्रण ठेवावे लागेल.

## शब्दगंध क्र. ७५३५

सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | | ४ | ■ | ५ | ६ |
| ७ | | | ■ | ८ | | | |
| ९ | | ■ | १० | | ■ | ११ | |
| ■ | | ■ | | ■ | १२ | ■ | |
| १३ | ■ | १४ | | ■ | १५ | १६ | |
| १७ | १८ | | ■ | १९ | | | ■ |
| २० | | | २१ | ■ | ■ | २२ | २३ |
| ■ | ■ | २४ | | ■ | २५ | | |

**आडवे शब्द :-** १) अगदी सारखे; तुल्य ५) सवय; राबता ; चाल; परिपाठ ७) पाणी अडविण्यासाठी नदीपात्रात वगैरे बांधलेली आडवी भिंत ८) चारित्र्यवान; चांगल्या वर्तणुकीचा ९) वस्तू; पर्वत; डाग १०) गोष्ट; कलम ११) इंग्रजी बंदूक १४) प्रबळ इच्छा; अति लोभ १५) वेतन; पेमेंट १७) भरलेले; घट्ट १९) उणीव; कमतरता; वानवा २०) बेतासबेत; जमा आणि खर्च यांची बरोबरी २२) अनेक पाय असलेला एक कीटक २४) एक हजार किलो किंवा दहा क्विंटल वजनाचे माप २५) गावचा मुख्य अधिकारी

**उभे शब्द :-** १) श्रीमंत; धनवान; तालेवार २) थकवा ; शीण; ग्लानी ३) गोडधोड करून खाण्याचा उत्साहाचा किंवा आनंदाचा दिवस ४) प्राक्तन; दैव; प्रारब्ध ५) महाग नसलेले; स्वस्त ६) ज्याला वतन आहे असा १०) पायऱ्या असलेली विहीर १२) परत; माघारी १३) बी पेरण्याचे एक औत; तिफण १४) कितीही मिळाले तरी तृप्त न होणारा १६) एक प्रकारचा पांढरा दगड १८) स्त्रीचे एक नाव २१) बारा राशींपैकी एक; मासा २३) घाण; विष्ठा

### शब्दगंध क्र. ७५३४ चे उत्तर

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| जं | त | ■ | भ | वा | नी | ■ | का |
| ग | र | ग | री | त | ■ | ग | ळ |
| ल | त | ■ | त | ड | क | ■ | बी |
| ■ | री | म | ■ | ■ | था | प | ट |
| खा | त | र | ज | मा | ■ | री | ■ |
| प | ■ | ग | ड | क | री | ■ | व |
| र | सा | ळ | ■ | डी | ■ | ज | प |
| ■ | य | ■ | वा | ण | सा | मा | न |

# ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋ मुलांचे विश्व ❋ ❋ ❋ ❋ ❋ ❋

**सुविचार :** जीवनात आनंदी राहायचे असेल तर दोन गोष्टी शिका - मनातलं सगळं सहन करायला आणि मनातलं सगळं सोडून द्यायला.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### आपले डोळे दोन आहेत तर आपल्याला दोन चित्रे का दिसत नाहीत?

आपल्या प्रत्येकाच्या चेहऱ्यावर दोन डोळे आहेत हे आपण लहानपणापासून पाहत आलो आहोत पण कधी तुम्ही विचार केला आहे का की दोन डोळे असूनही आपल्याला सगळे काही एकच का दिसते दोन दोन का दिसत नाही. यामागचे कारण आपल्या शरीराच्या आत दडलेले आहे आणि ते खूपच आश्चर्यकारक आहे. जेव्हा आपण समोरच्या कोणत्याही वस्तूकडे पाहतो जसे की समोर ठेवलेला पाण्याचा ग्लास तेव्हा आपला उजवा डोळा त्या ग्लासकडे थोडा उजव्या कोनातून पाहतो आणि आपला डावा डोळा त्याच ग्लासकडे थोडा डाव्या कोनातून पाहतो. म्हणजे एकाच ग्लासची दोन चित्रे तयार होतात आणि ही दोन्ही चित्रे एकसारखी नसतात त्यांच्यामध्ये खूप बारीक फरक असतो. आपल्या डोळ्याच्या आत मागच्या बाजूला एक पडदा असतो त्या पडद्यावर ही दोन्ही चित्रे उमटतात. तिथून ती चित्रे अतिशय बारीक धाग्यांसारख्या नसांमधून आपल्या डोक्याच्या आत असलेल्या मेंदूपर्यंत पोहोचतात.

मेंदू हा आपल्या शरीराचा मालक आहे आणि तोच सगळे निर्णय घेतो. मेंदूच्या अगदी मागच्या भागात एक विशेष ठिकाण आहे जिथे या दोन्ही चित्रांना एकमेकांवर ठेवून जोडण्याचे काम चालते. मेंदू दोन्ही डोळ्यांनी पाठवलेल्या चित्रांमधला फरक ओळखतो आणि त्या फरकातूनच तो अंदाज लावतो की समोरची वस्तू किती जवळ आहे आणि किती लांब आहे.

या सगळ्या प्रक्रियेला एकत्रित दृष्टी असे म्हणतात. या प्रक्रियेमुळेच आपल्याला जग हे फक्त एका कागदावर काढलेल्या चित्रासारखे सपाट न दिसता त्याला खोली आहे उंची आहे लांबी आहे हे समजते. जर आपल्याला एकच डोळा असता तर आपल्याला हे काहीच समजले नसते. आपण जिना चढताना पाय घसरलो असतो, गाडी चालवताना अंतराचा अंदाज चुकला असता, हातातला चेंडू झेलताना चुकलो असतो. दोन डोळे असल्यामुळे आपल्याला या सगळ्या गोष्टींचा अचूक अंदाज येतो. तुम्ही आता एक छोटा प्रयोग करून पहा, तुमचा एक डोळा हाताने बंद करा आणि समोर ठेवलेली पेन उचलण्याचा प्रयत्न करा तुम्हाला थोडे कठीण वाटेल. आता दोन्ही डोळे उघडा आणि तीच पेन उचला तुम्हाला ते अगदी सोपे वाटेल. हाच दोन डोळ्यांचा चमत्कार आहे.

कधी कधी आपण खूप आजारी असतो किंवा खूप थकलेलो असतो तेव्हा आपल्याला एका वस्तूची दोन चित्रे दिसतात कारण त्यावेळी आपला मेंदू थकलेला असतो आणि त्याला दोन्ही चित्रे नीट जोडता येत नाहीत. लहान बाळ जेव्हा जन्माला येते तेव्हा त्याच्या मेंदूला हे काम लगेच जमत नाही म्हणून बाळाचे डोळे कधी कधी इकडे तिकडे फिरतात. पण जसजसे बाळ मोठे होते तसतसा त्याचा मेंदू शिकत जातो आणि मग त्याला सगळे जग एकच आणि स्पष्ट दिसू लागते. निसर्गाने आपल्याला दोन डोळे एकाच गोष्टीची दोन चित्रे पाहण्यासाठी नाही तर त्या दोन चित्रांना एकत्र करून जग अधिक सुंदर आणि अधिक खरे पाहण्यासाठी दिले आहेत. म्हणूनच आपण या दोन डोळ्यांनी एकच जग पाहतो आणि हा आपल्या शरीरातला सर्वात मोठा चमत्कार आहे.

## लहान गोष्टी

एका गावात दोन मित्र राहत होते. एका मित्राकडे एकदम नवी कोरी महागडी मोटारसायकल होती आणि दुसऱ्या मित्राकडे एक जुनी साधी सायकल होती. मोटारसायकल असलेल्या मित्राला नेहमी गर्व वाटायचा. तो म्हणायचा माझी गाडी किती वेगाने धावते, किती आवाज करते, सगळे लोक माझ्याकडेच पाहतात. तुझी तर फक्त साधी सायकल, तिला कोणी विचारतही नाही.

सायकल असलेला मित्र कधीच काही बोलायचा नाही. तो रोज सकाळी आपल्या सायकलवरून कामावर जायचा. एक दिवस खूप मोठा पाऊस झाला. सगळ्या रस्त्यांवर पाणी भरले. मोटारसायकलच्या चाकांमध्ये चिखल अडकला आणि तिचे इंजिन बंद पडले. तो मित्र रस्त्याच्या मध्येच अडकून पडला. त्याला गाडी ढकलताही येईना आणि चालवताही येईना. त्याच वेळी सायकलवाला मित्र तिथे आला. त्याची हलकी सायकल चिखलातून, पाण्यातून सहज निघून जात होती.

त्याने मोटारसायकलवाल्या मित्राला मदत केली आणि त्याला आपल्या सायकलच्या मागे बसवून घरी आणले. तेव्हा मोटारसायकलवाल्या मित्राला समजले की किंमत आणि आवाज मोठा असणे म्हणजे मोठेपणा नाही. कधी कधी साधी आणि लहान वाटणारी गोष्टच जास्त उपयोगी पडते.

तात्पर्य - गर्व कधीच करू नये आणि छोट्या गोष्टींना कधीच कमी समजू नये.

## आत्मशक्ति



### अध्यात्मिक शक्ती

आमच्या सहकाऱ्यांपेक्षा आम्हाला जास्त कळते अशी समजूत करून घेतो. आमची नम्रता नाहीशी होते व सर्व ज्ञानाचा ठेवा माझ्या जवळच आहे असे समजू लागतो. सर्वांच्या अंतरी ज्ञानाचा प्रवाह वहात आहे हे आम्ही विसरतो. आम्ही दुसऱ्याहून जास्त बुद्धिमान आहोत असे समजून जेव्हा वागतो तेव्हा जे लोक साधेपणाने राहतात, ज्यांची विचारसरणी साधीभोळी असते व ज्यांना आमच्याएवढे प्रशिक्षण मिळालेले नसते अशांच्या मनाला वेदना होतील असे वागतो. आम्ही सौंदर्याबाबतही असेच वागतो. स्वतःला सर्वात सुंदर समजतो आमच्या सौंदर्याची एवढी बढाई गातो की आमच्याहून कमी सुंदर असले तरी लोक स्वतःला हीन समजू लागतात.

आम्ही आमच्या सौंदर्याचा वापर करून आपली कामे करवून घेतो व दुसऱ्यावर अधिकार गाजवितो. त्यांच्यावर ताबा मिळवितो. केवळ दिखावा करून दुसऱ्याला मोहित करून त्याचेकडून आपले काम करवून घेतो. अशा प्रकारे अहंकार आम्हाला धोकेबाजी, दिखावा, ढोंगाच्या मार्गावर नेतो. वास्तविकतः आपण जसे नाहीत, तसे आपल्या सौंदर्याच्या जोरावर दाखवितो. त्यामुळे दुसऱ्याचे नुकसान तर होतेच पण सर्वात जास्त स्वतःचे नुकसान होते.

जेव्हा आम्ही स्वतःबद्दल अधिक बढाया मारतो वा स्वतःबद्दल खूप काही समजतो तेव्हा आम्ही घमेंडी बनतो.

जेव्हा आमचे सारे लक्ष आपल्या बाह्य रुपावर असते, आपले शरीर, व्यक्तित्व, मन आणि संपत्ती ह्यांच्याच विचारात असते तेव्हा आपण आपल्या आत्म्यावर ध्यान केंद्रित करू शकत नाही. आत्मा संपूर्ण सौंदर्याने, ज्ञानाने व धनदौलतीने परिपूर भरलेला आहे. पण जोपर्यंत आम्ही आमचे शरीर व मन ह्याबद्दलच विचार करतो तोपर्यंत आत्मधनाची आम्हाला जाणीवच रहात नाही. बाह्य धनदौलत एक दिवस आम्हाला सोडून जाणार आहे व आम्ही मोकळ्या हाताने हे जग सोडून जाणार आहोत.बायबलमध्ये लिहिले आहे, ''इहलोकांत आपल्यासाठी दौलत जमवू नका!

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## चिरंतन प्रेमाकडे वाटचाल (नाती घट्ट विणू या)

### नाती घट्ट विणू या

लोकांची मतं बदलत राहणार आहेत हे कायम लक्षात ठेवायला हवं.सुरेश ओबेरॉय : कधीकधी लोक त्यांच्या मित्रांना म्हणतात, तू ह्या व्यक्तीशी लग्न का केलंस? तू दिसायला किती सुंदर आहेस पण तुझा जोडीदार तुला शोभत नाही. हे मत त्या व्यक्तीवर कायमचा परिणाम घडवू शकतं.

शिवानीदीदी : म्हणून नेहमी लक्षात ठेवा - 'माझी आवड, माझा निर्णय.' उदाहरणार्थ, जेव्हा मी ब्रह्मकुमारीजचा भाग बनण्याचा निर्णय घेतला तेव्हा माझ्या जवळच्या मित्रांपैकी कोणीही मला पाठिंबा दिला नाही. त्यांनी माझ्यावर टीका केली आणि यातून बाहेर पडण्यासाठी समजावलं. काहीतरी चुकीचं घडलं असेल असा विचारही त्यांनी केला. अशा वेळी स्वतः घेतलेल्या निर्णयाच्या योग्यतेबाबत आपण ठाम असलं पाहिजे. उद्या कदाचित आपला एखादा निर्णय चुकीचा ठरेल. पण ठीक आहे. आपले सगळे निर्णय नेहमी बरोबरच असतील असं नाही. पण ते आपले निर्णय असतील आणि आपण सगळी खात्री करूनच ते घेतलेले असतील. त्यामुळे होणाऱ्या परिणामांना आपण जबाबदार असू आणि त्यांना सामोरं जाण्याची आपली तयारी असायला हवी.

जर आपण स्वतःचे निर्णय स्वतः घेत नसलो तर आपली निर्णयक्षमता विकसित होणार नाही. मला स्वतःवर लक्ष केंद्रित करायचं आहे... मी एक आत्मा आहे... एक सुंदर ऊर्जा... माझे सगळे विचार आणि संस्कार माझ्या जाणिवेतून निर्माण झाले आहेत... माझ्या आयुष्यात तयार होणारी परिस्थिती माझ्या मागच्या कार्मिक खात्याप्रमाणे आहे... मी माझ्या निर्णयाचा सन्मान आणि आदर करतो... माझ्या निवडीचा मी आदर करतो... माझी निवड इतरांच्या मतांवर अवलंबून नाही... माझा आनंद इतरांच्या कौतुकावर अवलंबून नाही... मी संपूर्ण स्वाभिमानाने जगतो... आयुष्यातील माझ्याच निवडींचा आणि निर्णयांचा आदर करतो... बदल करण्यासाठी मी तयार आहे... ओम शांती! चिरंतन प्रेमाकडे घेऊन जाण्याचे मंत्रमुलं कदाचित तुम्ही काय सांगत आहात ते ऐकणार नाहीत; पण तुमची विचारपद्धती आणि वृत्ती यांचा मुलांवर खूप प्रभाव पडतो कारण ही तुमची स्पंदनं निर्माण करतात.नात्यांमध्ये प्रामाणिकपणा आणण्यासाठी आधी स्वतःमध्ये प्रामाणिकपणा असणं गरजेचं आहे. स्वतःत प्रामाणिकपणा म्हणजे तुमचे विचार, शब्द आणि कृती यांच्यात सुसंगती असणं. आपली कामगिरी, आवडनिवड आणि निर्णय या सगळ्यांबाबत आपण लोकांच्या प्रशंसेवर अवलंबून असतो तेव्हा आपला आत्मविश्वासही लोकांच्या स्वीकारार्हतेवर अवलंबून राहतो.वेगवेगळ्या लोकांचे दृष्टिकोन वेगवेगळे असतात आणि त्यामुळे त्यांची आवडनिवडही वेगवेगळी असते. त्यामुळे लोकांच्या बरोबर-चूक, चांगलं-वाईट, पसंती-नापसंती यांच्या व्याख्यापण वेगवेगळ्या असतात. आपल्या आवडनिवडीला किंवा निर्णयांना ते नेहमीच मंजुरी देतील अशी अपेक्षा आपण करू शकत नाही.

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

वडील : पप्पू, मोठा होऊन काय होणार? पप्पू : हिरो!

वडील : आणि अभ्यास नाही केला तर?

पप्पू : कॉमेडियन!

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

❋ भारत २०२८ मध्ये पहिल्यांदाच कोणती आशियाई अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करणार आहे? - आशियाई वरिष्ठ वुशू अजिंक्यपद स्पर्धा

**- अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदिक गर्भसंस्कार

### आयुर्वेदिक गर्भसंस्कार

शस्त्रक्रिया दरम्यान त्या नलिका उघडण्यात आल्या. काही दिवसांनी स्त्री रुग्णाचे वजन जास्त आहे; म्हणून पंचकर्माद्वारे शरीरशुद्धी करून वजन कमी केले. अशा पद्धतीने मी त्यांच्यावर लोपॅथिक व आयुर्वेदिक असे दोन्ही उपचार सुरू केले. उपचार सुरू असताना एक पाच महिन्यांनी गर्भधारणा राहिली; परंतु स्त्री रुग्णाने प्रवास केल्याने दीड महिन्यातच अंगावरून रक्तस्राव होण्यास सुरुवात झाली. सोनोग्राफी केल्यावर बाळाची वाढ कमी आहे असे दाखवण्यात आले. त्या वेळी मी पेशंटला हॉस्पिटलमध्ये डमिट करून संपूर्ण आराम दिला व आयुर्वेदिक मासानुमासिक औषधे सुरू केली. त्यानंतर रक्तस्राव पूर्णपणे थांबला व बाळाची वाढ चांगली झाली व काही महिन्यांमध्येच त्यांना सुदृढ, तेजस्वी व संस्कारक्षम असे बाळ झाले. सांगितले. ॐकारगुंजन, ध्यान, दीर्घश्वसन करावयास सांगून तिचे मन आनंदी व सकारात्मक विचारसरणीत ठेवण्याचा मी प्रयत्न केला. दर पंधरा दिवसातून आम्ही तिची सोनोग्राफी करून घेत होतो. प्रत्येक वेळी बाळाची वाढ चांगली होत होती, अशा पद्धतीने ॲलोपॅथिक, आयुर्वेदिक व आध्यात्मिक असे सर्वच उपचार तिच्यावर करत होतो व सर्वांना आश्चर्य वाटेल असा फरक तिच्यामध्ये व बाळामध्ये होत होता व काही महिन्यांमध्येच संपूर्ण वाढ झालेले बाळ जन्मास आले. यातून एकच निष्कर्ष झाले की, जर डॉक्टरांनी व रुग्णांनी धीर धरून सकारात्मक विचार ठेवले व उपचार केले तर नक्कीच आश्चर्यकारकरित्या यश संपादन होते. अगदी काही रुग्णांमध्ये वंध्यत्वाचे निदान होत नसेल अशा वेळी पती-पत्नीचे पंचकर्म जरी करून घेतले, तरी बऱ्याचशा रुग्णांमध्ये दोन-तीन महिन्यात लगेचच गर्भधारणा होते. हा अनुभव आम्ही कित्येक रुग्णांमध्ये घेत आहोत. **(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**
दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर
अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# बुऱ्हाणनगरच्या अंबिका माता तुळजाभवानी देवी मंदिरात महापूजा ध्वजारोहण, घटाची शोभा यात्रा आणि घटस्थापना



नगर – बुऱ्हाणनगर ता.नगर येथील कुलस्वामिनी तुळजाभवानी देवी मंदिरात सकाळी नवरात्रौत्सवास भक्तिपूर्ण वातावरणात प्रारंभ झाला. यानिमित्ताने मंदिरातील तुळजाभवानी देवीची सकाळी महापूजा अभिषेक करून ध्वजारोहण करून विधिवत घटस्थापना देवीचे पुजारी विजय भगत आणि कुटुंबीयांनी केली. 'आईराजा उदो उदो...सदानंदीचा उदो उदो..., तुळजाभवानी देवी की जय... असा देवीचा जयघोष उपस्थित भाविकांनी केला. शारदीय नवरात्रीच्या पहिल्याच दिवशी कुलस्वामिनी तुळजाभवानी देवीच्या दर्शनास भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली आहे.

घटस्थापणे पूर्वी पुजारी भगत परिवारातील महिलांनी डोक्यावर सजवलेले घट व पुरुषांनी भगवे ध्वज, अबकारी हातात घेत तुळजाभवानी देवीचा जयजयकार करत मंदिराला प्रदक्षिणा मारली. या प्रदक्षिणे नंतर मंदिराचे मुख्य पुजारी ॲड. विजय भगत, सौ.दुर्गा भगत, ॲड. अभिषेक भगत, कुणाल भगत, राजेंद्र भगत, अंजली भगत, किरण भगत, मनीषा भगत, सुभाष भगत, सुनंदा भगत, कविता भगत, रोहन भगत, ॲड.अजिंक्य भगत, वैभवी भगत, अंकिता भगत, ॲड. संकेत भगत, अक्षदा भगत, वेदिका भगत क्षताक्षी व वेद भगत यांनी मंदिरात विधिवत घटस्थापना करून देवीची महाआरती केली. नवरात्रोत्सवानिमित्त तुळजाभवानी देवीची मूर्ती सुवर्ण अलंकारांनी मढण्यात आली होती. तसेच विविध फुलांच्या माळांनी देवीचे रूप अधिकच प्रसन्न वाटत होते.

शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त बुऱ्हाणनगरच्या तुळजाभवानी देवी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. मंदिर परिसरातही सजावट करण्यात आली आहे. देवीच्या मुखदर्शनाची वेगळी व्यवस्था करण्यात आली आहे. दिवसातील २० तास भाविकांना देवीचे दर्शन घेता येणार आहे. नवरात्रोत्सवा निमित्त पुढील १० दिवस भरगच्च धार्मिक आणि आरोग्य शिबिराचे कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. तुळजाभवानी देवीचे दर्शन श्री बुऱ्हाणनगर देवी या पेजवर सर्व समाज माध्यमांवर उपलब्ध आहे, अशी माहिती मंदिराचे पुजारी ॲड.अभिषेक भगत यांनी देवून सर्व भाविकांनी येथील धार्मिक कार्याक्रमांचा व देवीच्या दर्शनचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले आहे.

तुळजाभवानी देवीच्या दैनंदिन पुजेची माहिती कुणाल भगत यांनी दिली. यावेळी प्रांत संघ चालक नानासाहेब जाधव, विभागीय पोलीस अधिकारी दिलीप टिपरसे, भिंगार कैंप पोलीस निरीक्षक थोरात मॅडम, रोटरी क्लबचे सदस्य, डॉक्टर्स आणि भाविक भक्त उस्पस्थित होते.

# तुळजाभवानीच्या पालखीचे नेप्तीत उत्साहात स्वागत



नगर – नगर तालुक्यातील नेप्ती येथे महाराष्ट्राची कुलस्वामिनी आई तुळजाभवानीच्या पवित्र पालखीचे उत्साहात स्वागत करण्यात आले. संबळाचा कडकडाट, 'आई राजा उदो–उदो'चा जयघोष, हळद–कुंकवाची उधळण आणि फुलांच्या वर्षावाने संपूर्ण गाव भक्तिरसात न्हाऊन निघाले. गावातील महिला भगिनींनी औक्षण करून पालखीचे स्वागत केले अशी माहिती रामदास फुले यांनी दिली.

ढोल–ताशांच्या गजरात आणि फटाक्यांच्या आतषबाजीत गावातील प्रमुख मार्गांवरून पालखीची मिरवणूक काढण्यात आली. घरांसमोर आकर्षक रांगोळ्या काढून, ग्रामस्थांनी आई तुळजाभवानीचे भक्तिभावाने स्वागत केले. गावातील तुळजाभवानी मंदिरात पालखी दर्शनासाठी ठेवण्यात आली होती. हजारो भाविकांनी आईचे दर्शन घेऊन आशीर्वाद घेतले. वस्ताद बाबासाहेब पवार यांच्या हस्ते पालखीची विधिवत पूजा करण्यात आली, तर गोंधळी पोपट जाधव, राहुल गवारे यांच्या हस्ते आरती करण्यात आली.

वस्ताद बाबासाहेब पवार म्हणाले, आई तुळजाभवानी ही महाराष्ट्रातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असून, नवसाला पावणारी आणि भक्तांच्या हाकेला धावून येणारी माता म्हणून तिची ख्याती आहे. आईच्या दर्शनाने मनाला समाधान, नवी ऊर्जा आणि संकटांशी सामना करण्याचे बळ मिळते. आज आई तुळजाभवानीची पालखी आपल्या नेप्ती गावात दाखल झाली, हा प्रत्येक ग्रामस्थासाठी आनंदाचा आणि भाग्याचा क्षण आहे. या पवित्र पालखीच्या आगमनामुळे गावातील भक्तिमय वातावरण अधिकच प्रसन्न झाले आहे. आईच्या चरणी प्रार्थना आहे की, नेप्ती गावातील प्रत्येक कुटुंबात सुख, समृद्धी आणि शांती नांदावी. गावातील शेतकरी सुखी व्हावा, आणि सर्वांच्या जीवनात आनंदाचे दिवस यावेत. आई तुळजाभवानीने सर्वांचे दुःख दूर करून गावावर आपली कृपादृष्टी कायम ठेवावी, अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

पवार पुढे म्हणाले, धार्मिक परंपरा आणि उत्सव हे केवळ पूजाअर्चेपुरते मर्यादित नसून, समाजाला एकत्र आणण्याचे आणि माणसामाणसांतील नाते अधिक दृढ करण्याचे प्रभावी माध्यम आहे. आईच्या पालखीच्या स्वागतासाठी गावातील सर्व सम ाजघटकांनी एकत्र येऊन दाखवलेला उत्साह कौतुकास्पद आहे. अशा धार्मिक सोहळ्यांमुळे नव्या पिढीला आपल्या संस्कृतीची, परंपरांची आणि श्रद्धेची ओळख होते. गावात एकोपा, बंधुभाव आणि परस्पर सहकार्याची भावना कायम राहिली, तर गावाच्या सर्वांगीण विकासालाही बळ मिळते. आई तुळजाभवानीच्या आशीर्वादाने नेप्ती गावात सुख–समृद्धी नांदू दे असे प्रतिपादन बाबासाहेब पवार यांनी केले.

या धार्मिक सोहळ्यास माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, वस्ताद बाबासाहेब पवार, रामदास फुले, राहुल गवारे, राजू कुलकर्णी, बाबासाहेब जपकर, माजी उपसरपंच दादू चौगुले, वसंत पवार, विजय कर्पे, पाराजी चौरे, अशोक चौरे, बाळासाहेब बेल्हेकर, चेअरमन उमर सय्यद, पालखीचे मुख्य मानकरी रवींद्र भगत, लहानू गवारे, रावसाहेब कर्पे, अतुल गवारे, विठ्ठल चौरे ,चंद्रकांत खरमाळे, गोंधळी संतोष जाधव, रोहिदास साळवे, श्रीनिवास जपकर, रामदास गवारे, अंबादास जपकर, सहादू जपकर, शोभा पवार, मेधा पवार, आकाश पवार, निखिल भगत, भाऊसाहेब भगत उपस्थित होते.

# प्रेरणादायी अक्षरधन

## अनीतीची चीड आली पहिजे




जेव्हा समाजाला लागते अनीतीची कीड तेव्हा माणसाला यावी चीड मुळीच पडू नये भीड. भ्रष्टाचारी व्यक्ती असो केवढीही प्रतिष्ठित आपली बुद्धी होऊ नये कुंठित. पण अशी चीड माणसाला येत नाही. स्वार्थ, क्षणिक मतलब आणि त्या प्रतिष्ठितांविरुद्ध जाण्याचे भय. हे सारे मनात उफाळणाऱ्या अनीतीविरुद्धच्या उठावाला दाबून टाकते. माणूस भयभीत दुबळा आणि नेभळट बनतो. अनीती खपवून घेतो. उलट आपल्या अगतिकतेचे अनितीला खतपाणी घालतो. मग भ्रष्टाचार फोफावतो. ऋग्वेदकाळच्या मन्युतापस नावाच्या संतप्त ऋषीने चीड ही देवता मानली आहे. तिला तो मन्यु म्हणतो. मन्यु म्हणजे अनितीविरोधी चीड. विवेकपूर्ण वर्तनातून व्यक्त होणारा क्रोध म्हणजे मन्यु. तो ऋषी चीड ही दैवी शक्ती मानतो. ही प्रत्येकात असायला हवी. पुरुषार्थाचे ती भूषण मानावी. अन्यायाविरुद्ध ज्याला चीड येत नाही, अशा दुबळ्याची अगतिक अवस्था न दीनता या ऋषीने व्यक्त केली आहे.

मी केवढा अभागी नाही. आली चीड मला अनीतीची. किती दूर गेलो आहे मी पुरुषार्थपासून? चीड येणे, ही दैवी शक्ती होय. तिचा महिमा मी जाणतो. तरी मी तिच्याकडे पाठ फिरवतो? मूर्ख मी. कर्तव्यापासून विमूख झालो आहे मी. माझ्या पौरुषात ही केवढी कमतरता आता मला सन्मानानं जगण्याची कुठली हमी? लाज वाटते. अनीतीविरुद्ध लढण्याचा संकल्प सोडला होता. त्याची कशी सोईस्कर विस्मृती झाली मला? आता आलो आहे हे मन्यु देवा, तुला शरण. दे मला सामर्थ्य येऊ दे चीड आणि उठू दे सर्व शक्तीनिशी करायला बीमोड त्या अनीतीचा.

पुढे तो ऋषी म्हणतो, अनीतीविरुद्धची ही चीड सविष्णू आहे. तशीच ती विष्णूही आहे. ती संघर्ष करायला बळ देते. मन प्रसन्न राखते. आनंदाला उधाण येते. दुष्ट प्रवृत्तीचा ती सहज नाश करवते. शत्रूला भयभीत करते. अन्यायविरुद्ध लढणाऱ्याला ऐश्वर्य प्रदान करते. ही चीड म्हणजे क्रोध नव्हे. अविवेक, स्वार्थ, मोह पायापी होणारी दुर्बुद्धी नव्हे. ही विवेक आहे. ही ज्ञानरूप आहे. ही सन्मार्ग दाखविणारी प्रकाशशलाका आहे. ज्याला अनिती, अन्याय व जुलूम याविरुद्ध चीड येत नाही, त्यांच्याविरुद्ध जो पेटून उठत नाही, तो जिवंत असूनही मृतच समजावा. माणूस असूनही किड्यामुंगीत गणावा. चीड यावीच. पण ती अकारण नसावी. उगाच आदळआपट व स्वतःचेच रक्त जाळणारा संताप नसावा. बुद्धी व युक्ती वापरून अनीतीचा नाश करावा.

एक वृद्धा होती. तिला अंधूक दिसे. वस्तू पकडायची तर चाचपडत गेल्यावर हाती लागत असे. तिने वैद्याला बोलाविले. तो रोज डोळ्यांत औषध घालू लागला. जाताना डोळ्यांना पट्टी बांधून ठेवू लागला.

काही दिवसांनी वृद्धेला दिसू लागले. पण वैद्याची अनीती तिच्या लक्षात आली. वृद्धेच्या डोळ्यांना पट्टी बांधली, की रोज घरातली एकेक वस्तू त्याने लांबवली. दृष्टी दिली. म्हणून त्याने पैशाची मागणी केली. वृद्धेने स्पष्ट नाकारली.

माझ्या सेवेचे, औषधाचे पैसे देत नाहीस? त्याने राजाकडे तक्रार केली. राजाने वृद्धाला बोलावले. राजा म्हणाला तुला पूर्वी अंधूक दिसत होते, आता नीट दिसत ना ?

वृद्धा म्हणाली, पण हे नवं चांगलं दिसणं तापदायक झालं. पूर्वी अंधूक का होईना, घरातल्या मौल्यवान वस्तू दिसत. हाती लागत. आता जी दृष्टी आली, तिच्यामुळे त्या घरात दिसत नाहीत. हाती लागत नाहीत.

राजा समजला. वैद्याच्या घराची झडती घेण्यात आली. म्हातारीच्या वस्तू वैद्याकडे सापडल्या. वैद्याला शिक्षा झाली. म्हातारीची अन्यायाविरुद्धची चीड सफल झाली.

– किशोर गांधी



**श्री सुक्त व भजन संध्या कार्यक्रम...** शारदीय नवरात्र उत्सव निमित्ताने सिव्हिल हडको सावेडी परिसरातील भक्ती भजनी मंडळाने सौ.रेवती रविंद्र कुलकर्णी यांच्या घरी श्री सुक्त पठण व भजनचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



राधा–कृष्ण मंदिरात विधिवत पूजा–अर्चा करून भक्तिमय वातावरणात घटस्थापना करण्यात आली. याप्रसंगी उपस्थित असलेले भाविक.

# सर्जेपुरा येथील राधा–कृष्ण मंदिरात नवरात्रोत्सवाला प्रारंभ

### विधिवत घटस्थापना, ६० वर्षांची धार्मिक परंपरा कायम! धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रम; कीर्तन, माता की चौकी आणि महाप्रसादाची पर्वणी

नगर – पंजाबी सनातन धर्मसभेच्या सर्जेपुरा येथील राधा–कृष्ण मंदिरात ११ ऑक्टोबर रोजी सकाळी विधिवत पूजा–अर्चा करून उत्साहपूर्ण आणि भक्तिमय वातावरणात घटस्थापना करण्यात आली. नवरात्रोत्सवाच्या प्रारंभानिमित्त मंदिरात विविध धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. घटस्थापना कार्यक्रमात शीख व पंजाबी भाविकांनी देवीचा जयघोष करून भक्तिभाव व्यक्त केला.

राधा–कृष्ण मंदिरात गेल्या ६० वर्षांपासून नवरात्रोत्सवानिमित्त घटस्थापना करण्याची आणि विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्याची परंपरा जपली जात आहे. यंदाही ही परंपरा कायम ठेवत मंदिरात नवरात्रोत्सवाचे नियोजन करण्यात आले आहे. मंदिर परिसरात आकर्षक फुलांची सजावट आणि विद्युत रोषणाई करण्यात आली असून, त्यामुळे मंदिराचे वातावरण अधिक प्रसन्न आणि भक्तिमय झाले आहे.

नवरात्रोत्सवाच्या कालावधीत भाविकांना भक्तिरसाचा अनुभव घेता यावा, यासाठी दररोज विविध धार्मिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. महिला मंडळाच्या वतीने दररोज सायंकाळी ४ ते ६ या वेळेत कीर्तन होणार आहे. तसेच दररोज सायंकाळी ७ वाजता मातेची आरती करण्यात येणार आहे. या धार्मिक कार्यक्रमांमुळे भाविकांना एकत्र येऊन देवीची उपासना करण्याची आणि भक्तिमय वातावरणात सहभागी होण्याची संधी मिळणार आहे. मंदिरातील सजावट, विद्युत रोषणाई आणि धार्मिक कार्यक्रमांमुळे नवरात्रोत्सवाचा उत्साह अनुभवायला मिळत आहे.

नवरात्रोत्सवानिमित्त १४ ऑक्टोबर रोजी रात्री ८ वाजता मंदिरात 'माता की चौकी' या विशेष धार्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात कलाकारांच्या वतीने देवीची भक्तिगीते सादर करण्यात येणार आहेत. भक्तिगीतांच्या माध्यमातून देवीचा महिमा आणि भक्तिभाव व्यक्त केला जाणार आहे. भक्तिगीतांच्या कार्यक्रमानंतर देवीची आरती होणार असून, आरतीनंतर उपस्थित भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात परिसरातील भाविकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन मंदिर ट्रस्टच्या वतीने करण्यात आले आहे. १९ ऑक्टोबर रोजी सकाळी ९.३० वाजता महिला भजन मंडळीच्या उपस्थितीत पूर्णाहुती यज्ञ होणार आहे.

# आदिशक्तीचा जागर म्हणजेच स्त्रीतत्वाचे जागरण

### हभप मिलिंद महाराज चवंडके यांचे प्रतिपादन; सनातन धर्मसभेच्या शारदीय व्याख्यानमालेचा विधीवत शुभारंभ



नगर – मातृशक्तीच्या सन्मानासाठीच नवविध भक्तीचे नवरात्र साजरे केले जाते. नवरात्रौत्सवात आदिशक्तीचा जागर करणे म्हणजेच स्त्रीतत्वाचे जागरण करणे होय, असे प्रतिपादन प्रवचनकार हभप मिलिंद महाराज चवंडके यांनी केले.

येथील सनातन धर्मसभेच्या शारदीय व्याख्यानम ालेचा संकल्पपूर्वक विधीवत शुभारंभ हभप मिलिंद महाराज चवंडके आणि सौ.सोनाली चवंडके यांच्या हस्ते करण्यात आला. पौरोहित्य वेदमूर्ती उमेश वाळुंजकर यांनी केले. देवी शारदेच्या प्रतिमेचे पूजन आणि आरती करून प्रवचन सोहळ्याचा श्रीगणेशा करण्यात आला. वेदमूर्ती चकोर गुरू मुळे यांनी केलेल्या वेदमंत्र पठणाने वातावरणातील प्रसन्नता व्दिगुणित झाली. धर्मसभेचे मंत्री दिनकर देशमुख आणि खजिनदार उमेश नगरकर यांनी स्वागत केले. उपाध्यक्ष हभप निळकंठ महाराज देशमुख यांनी परिचय करून दिला. विश्वस्त समीर उपाध्ये, उदय वैकर, ॲड. अच्युतराव पिंगळे, अनंतराव देशपांडे, विश्व हिंदू परिषदेचे विभाग मंत्री सुनिलराव खिस्ती, जिल्हा सहमंत्री शरदराव नगरकर, रा.स्व.संघाचे हिरालाल पटेल, प्रविण सोनी, सोन्याबापू मुदळ, मातृशक्तीच्या जिल्हा संयोजिका सौ. हिराताई शहापुरे, सौ.राणी भागानगरे, श्रीमती सुनंदा पानसरे, सौ.साधिका देशमुख आदींसह भाविक उपस्थित होते. विश्वस्त रमेश देशपांडे यांनी आभार मानले.

मिलिंद महाराज चवंडके पुढे म्हणाले, नवरात्रीच्या पर्वात शास्त्रानुसार काय काळजी घ्यावी? आपल्या कुटुंबातील चालिरीती प्रमाणे, चालत आलेल्या रूढीप्रमाणे, घराण्यातील परंपरेप्रमाणे अत्यंत श्रध्दायुक्त अंत:करणाने आपल्या कुलस्वामिनीची उपासना, आराधना, उपवास विधीपूर्वक करावेत. नवरात्रीत आदिशक्तीचे तत्व पृथ्वीवर अधिक प्रमाणात येत असल्याने देवीच्या दिव्य सान्निध्याची अनुभूती मिळते. दृष्टांत घडतात. देवी घराघरात या काळात वास्तव्यास आलेली असते श्रध्दावंतांना देवीचे दर्शन घडते.

कोणताही शास्त्राधार नसलेल्या नऊ रंगाच्या साड्या परिधान करून स्वतःची फसवणूक करून न घेता नवरात्रीत नऊ माळा कोणत्या फुलांच्या अर्पण कराव्यात? नवरात्रीत देवीला कोणकोणते नैवेद्य दाखवावेत, हे देवी भागवतात सांगितले आहे ते जाणून घ्यावे. घरातील सुख, शांती, समृद्धीसाठी स्कंद पुराणात सांगितल्याप्रमाणे २ ते १० वर्षांच्या आतील स्वजातीय कुमारिकांचे पूजन करावे.

देवीकवच–श्री दुर्गा स्तोत्र, श्रीमहिषासुरमर्दिनी स्तोत्र, ७०० महामंत्र असलेल्या सप्तशतीच्या संपूर्ण पाठाचे फळ देणारे कुंजिका स्तोत्र, श्री लक्ष्मीची आराधना करण्यासाठी ऋग्वेदातील श्रीसुक्त, सप्तशृंगी स्तोत्र, देवीच्या उपासनेतील अडथळे घालवणारे अर्गला स्तोत्र, श्रीदुर्गा कवच, श्रीभवानी सहस्त्रनामावली, देवी स्तुती करून ध्यान व प्रार्थना करावी. आपल्या घरातील कुलदेवतेतील देवत्व अधिक प्रभावी व्हावे, आपल्या घरावर कुलस्वामिनीचे कृपाछत्र कायम असावे, दैत्यांच्या रूपात आपल्या आजूबाजूला वावरणाऱ्या शत्रूंपासून आपल्या कुटुंबियांचे संरक्षण व्हावे या सद् हेतूने आदिशक्तीचे संरक्षण कवच मिळविण्यासाठी संकल्पपूर्वक उपासना करावी. नवरात्रीतील नियम पालनाने आपला भक्तीभाव वृध्दिंगतच होतो.

नवरात्रीत नाथभक्त नाथपंथी अनुष्ठान करतात. श्रीरामरक्षेचे अनुष्ठानही केले जाते. आदिमाता आदिशक्तीपासून निर्माण झालेले स्त्री तत्व शिवामध्ये विलीन होऊन शिवशक्ती स्वरूपात विश्वाचे कल्याण करते. स्त्रीयांनी आपण आदिशक्तीच्या अंश आहोत, याचा अभिमान उरी बाळगण्याचा संदेश नवरात्रौत्सव देते, असे मिलिंद महाराज चवंडके यांनी सांगितले. विविध उदाहरणे देत त्यांनी मांडलेले दृष्टांत उपस्थितांना प्रभावित करणारे ठरले.

# श्री रेणुका माता देवस्थानात घटस्थापना; दुष्काळ हटविण्यासाठी देवीचरणी प्रार्थना



नगर – एमआयडीसी नवनागापूर येथील श्री रेणुका माता देवस्थान ट्रस्ट येथे ११ ऑक्टोबर रोजी नवरात्रोत्सवाला भक्तिमय वातावरणात प्रारंभ झाला. आमदार संग्राम जगताप व सौ. शितल जगताप यांच्या हस्ते विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. स्थापनेनंतर देवीची आरती करण्यात आली. संबळाचा निनाद आणि देवीच्या आरतीने संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला. यावेळी शेतकरी बांधवांना दिलासा मिळावा, पशुधनाचे रक्षण व्हावे, पाऊस पडावा आणि दुष्काळाचे संकट दूर व्हावे, यासाठी देवीच्या चरणी प्रार्थना केली.



प्रारंभी एमआयडीसी परिसरातून देवीची मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत मोहटा देवी येथून आणलेली पवित्र ज्योत घेऊन युवक सहभागी झाले होते. या ज्योतद्वारे मंदिरातील दीपमाळ प्रज्वलित करण्यात आली. त्यानंतर विधिवत पूजा आणि आरती करण्यात आली. धार्मिक वातावरण, संबळाचा गजर आणि देवीच्या जयघोषामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते.

घटस्थापना कार्यक्रमासाठी देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष प्रभाकर भोर, उपाध्यक्ष साहेबराव भोर, सचिव दत्तात्रय विटेकर, खजिनदार एकनाथ वाघ, विश्वस्त राजू भोर, विष्णू भोर, किरण सप्रे, गणेश कातोरे, महेश सप्रे, सचिन कोतकर, नगरसेवक कुमारसिंह वाकळे, नवनाथ कातोरे, संपत बारस्कर आणि भाविक उपस्थित होते.

# निखळ मनोरंजनाचा खजाना म्हणजे 'जिजाऊ ग्रुप'



साधारण दहा बारा वर्षे झाली मी जिजाऊ ग्रुपची स्थापना केली. उद्देश हाच होता की ज्या महिला फक्त घरकाम आणि नवरा मुलं यांच्या तैनातीत असतात त्यांनी या कौटुंबिक कर्तव्य पार पाडत असताना स्वतः च्या प्रकृती कडे गांभीर्याने लक्ष द्यावे. हा साधा उद्देश घेऊन जिजाऊ ग्रुप मध्ये योग क्लास व हास्य योग घेत होते आणि घेते आहे. सध्या जिजाऊ मध्ये साडेतीनशे स्त्रिया आहेत व पन्नास पुरुष देखील आहेत.

आमच्या जिजाऊ क्लास ची खासियत आहे की व्यायामा व्यतिरिक्त मानसिक ताण कमी करण्यासाठी, चित्तवृत्ती प्रफुल्लित राहाण्यासाठी काही उपक्रम आवर्जून घेतले जातात. त्यापैकी एक म्हणजे चक्रा हिलींग घेण्यात येते. योग हास्य योग, ॲक्वा योग आणि संतुलित चक्र यामुळे आनंददायी जीवनाची गुरुकिल्ली म्हणजे जिजाऊ ग्रुप ठरत आहे.

आमच्या क्लासचे दुसरे वैशिष्ट म्हणजे इथे वय वर्षे अठरा पासून तर पंच्याहत्तर वय असलेल्या महिला येतात. त्यांची शारीरिक व मानसिक अभिवृत्ती उल्हासित करणारे काही कार्यक्रम आयोजित करण्यात येतात उदाहरणार्थ हुरडा पार्टी, लेझीम पथक, दांडिया गरबा अशा सामुहिक उपक्रमात सगळे जण आपापल्या आयुष्यातील ताण तणाव विसरून आनंद लुटतात. याबरोबरच संक्रांतीचे हळदीकुंकू, नवरात्री मध्ये पैठणीचा खेळ, दिपावली मध्ये प्रत्यक्ष गोमातेचे पूजन अशा कार्यक्रमांतून संस्कृतीचा वारसा पुढे नेणारा जिल्ह्यातील जिजाऊ ग्रुप एकमेव आहे. जिजाऊ ची ऐतिहासिक ठरलेली सहल म्हणजे काश्मीर सहल आहे. होळी आणि रंगपंचमी सणांमागे काही भावनिक गोष्टी देखील जोडलेल्या असतात. याबरोबरच रक्तदान, स्वच्छता अभियान, साक्षरता अभियान आणि सामाजिक बांधिलकी जपणारा मदतीचा हात हे आणखी काही विशेष उपक्रम जिजाऊ ग्रुप कडून करवून घेतले जातात.

निखळ मनोरंजनाचा खजाना म्हणजे जिजाऊ ग्रुप आहे आणि याचे एक उदाहरण म्हणजे संपूर्ण ग्रुप महिन्यातून एकदा सगळे मिळून मुव्ही पाहायला जातात. आनंदाची बेगमी म्हणजे हा ग्रुप आहे. पुढील पाच वर्षांत जिजाऊ ग्रुप द्वारा समाजसेवा या विषयातंर्गत काही अभिनव उपक्रम राबविले जाणार आहेत. त्यापैकी एक आत्ता वर्तमानात देखील सुरू आहे. तो म्हणजे 'आपली खरेदी एका छताखाली' या मध्ये लघु उद्योजकांना प्रोत्साहन व आडते बाजारात न अडकता शेतकरी ते घरी असे काही सेंद्रिय उत्पादने जिजाऊ ग्रुप मध्ये मिळतात...

– सौ.मनिषा संजय गुगळे,
अधिष्ठात्री जिजाऊ ग्रुप, जॉईंट सेक्रेटरी स्नेहालय,
कार्यकारिणी भारतीय जैन संघटना.



दुर्गामाता दौडला सावेडी उपनगरातील धर्मवीर चौक (प्रोफेसर कॉलनी चौक) येथील छत्रपती शंभूराजांच्या मूर्तीला अभिवादन करून जल्लोषात प्रारंभ झाला.

# दुर्गा माता दौडला जल्लोषात प्रारंभ, पुष्पवृष्टी करून ठिकठिकाणी स्वागत

नगर – संभाजी भिडे गुरुजी यांच्या प्रेरणेने व शहर व उपनगरातील धारकऱ्यांच्या प्रयत्नातून आदी माता जगदंबेला साकडं घालणाऱ्या दुर्गामाता दौडला सावेडी उपनगरातील धर्मवीर चौक (प्रोफेसर कॉलनी चौक) येथील छत्रपती शंभूराजांच्या मूर्तीला अभिवादन करून जल्लोषात प्रारंभ झाला. हर हर महादेव, जय श्रीरामच्या, माता जगदंबेच्या जय जयकारात छत्रपती शिव–शंभूचा जयघोष करीत अबाल, तरुण, वृद्ध, अतिवृद्ध भगव्या ध्वजाच्या नेतृत्वात शिस्तबद्ध रीतीने दोन दोनच्या रांगेत निघाले. या दौडचे ठिकठिकाणी परिसरातील नागरिकांनी औक्षण केले व पुष्पवृष्टी केली.

तारकपूर परिसर येथील वसाहतीत धारकऱ्यांनी फेरी मारत नवरात्र उत्सव मंडळाच्या प्रतिष्ठापित देवी मातेची आरती करण्यात आली. यावेळी शिवप्रतिष्ठान हिंदुस्तानचे जिल्हाप्रमुख बापू ठाणगे यांनी उपस्थित धारकऱ्यांना व परिसरातील नागरिकांना दुर्गा माता दौडचे व आगामी काळात हिंदू जनजागृतीची महत्त्व समजावून सांगितले.

# मर्चंटस् बँकेत घटस्थापनेला केशरी रंगात स्त्री शक्तीचा जागर

नगर – शारदीय नवरात्र उत्सवाला रविवारी घटस्थापनेपासून प्रारंभ झाला आहे. यानिमित्त अहमदनगर मर्चंटस को ऑप. बँकेत सर्व महिला कर्मचाऱ्यांनी एकत्र येत स्त्री शक्तीचा जागर केला. केशरी रंगाच्यासाड्या परिधान करून महिलांनी या कार्यक्रमात सहभाग घेतला. पारंपरिक रिवाजाप्रमाणे देवीची आराधना करत महिलांनी विविध स्पर्धांचा निखळ आनंद घेतला. कार्यक्रमास महापौर ज्योतीताई गाडे, बँकेच्या संचालिका मिनाताई मुनोत, संचालिका प्रमिलाताई बोरा, नगरसेविका मिनाताई चोपडा, जिजाऊ ग्रुपच्या मनिषाताई गुगळे, मर्चंटस बँकेचे चेअरमन संजय चोपडा, प्रभारी सीईओ नितीन भंडारी, कर्मचारी प्रतिनिधी प्रसाद गांधी आदी उपस्थित होते. विविध स्पर्धातील विजेत्यांना बक्षिसे देऊन सन्मानित करण्यात आले.

महापौर ज्योतीताई गाडे म्हणाल्या, शारदीय नवरात्र उत्सव सर्वत्र उत्साहात साजरा होत आहे. या काळात आदिशक्तीची पूजा केली जाते. देवीची विविध रूपे स्त्री मधील सामर्थ्य दर्शवणारी आहेत. मर्चंटस बँकेत दरवर्षी महिला कर्मचारी एकत्र येऊन नवरात्र उत्सव साजरा करतात हे कौतुकास्पद आहे.



अशा कार्यक्रमांतून धार्मिकता, संस्कृती जोपासली जाते. या बँकेच्या सातत्यपूर्ण यशस्वी वाटचलीत महिला कर्मचाऱ्यांचा मोठा वाटा आहे, याचा एक महिला म्हणून खूप अभिमान वाटतो.

चेअरमन संजय चोपडा म्हणाले, मर्चंटस् बँकेने नेहमीच संस्थापक चेअरमन हस्तीमल युनोत यांच्या नेतृत्वाखाली महिलांना प्रोत्साहन दिले आहे. तारकपूर शाखेचे संपूर्ण संचालन महिला कर्मचारीच करतात. सर्वजणी अतिशय सक्षमपणे काम करून बँकेची प्रतिमा उंचावत असतात. नवरात्रीत सर्व महिला कर्मचारी एकत्र येऊन सणाचा आनंद लुटतात. अशा उपक्रमांमुळे महिलांना हक्काचे व्यासपीठ मिळते. त्यांची ऊर्जा, कार्यक्षमता वाढण्यास मदत होते.

मिनाताई मुनोत म्हणाल्या, मर्चंट्स बँकेच्या महिला कर्मचारी बारा वर्षांपासून नवरात्र उत्सव साजरा करतात. बँकेत ६५ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. कुटुंब आणि नोकरी अशा जबाबदाऱ्या समर्थपणे पेलताना महिला आपली सक्षमता दाखवून देतात. आर्थिक व्यवहार सांभाळताना खूप जबाबदारीने काम करावे लागते. अनेक आव्हाने असतात. अशावेळी मानसिक दृष्ट्या कणखर होण्यासाठी एकत्र येऊन सण उत्सव साजरे केल्याने खूप सकारात्मक ऊर्जा मिळते. महिलांनी धर्माचरण केल्यास पुढच्या पिढीलाही योग्य संस्कार मिळतात. याच उद्देशाने मर्चंटस् बँकेत महिलांना एकत्र आणणारा नवरात्र उत्सव साजरा होतो. सर्व महिला कर्मचारीच संपूर्ण कार्यक्रमाचे आखीव रेखीव नियोजन करतात. त्यांच्यातील मॅनेजमेंट कौशल्य यातून दिसून येते.

मनिषा गुगळे म्हणाल्या की, नवरात्र उत्सव सर्वत्र चैतन्य निर्माण करणारा असतो. मर्चंटस बँकेतही या कार्यक्रमातून नवचैतन्य निर्माण झाले आहे. महिला शक्ती आदिशक्तीचे मनोभावे पूजन करून उत्सवाचा आनंद घेत आहे.

खुशाली मुथियान यांनी आभार मानले.

# पेशवेकालीन शाहीर सातोप्पा शिलारखाने भिंगार कलगीतुऱ्याचे जनक



भिंगार – नवरात्रोत्सवात तिसऱ्या माळेला यात्रेनिमित्त कलगीतुऱ्याचा फड रंगतो. ही परंपरा पेशवेकालीन असून लिंगायत गवळी समाजातील कलगीवाले शाहीर सातोबा (सातोप्पा) शिलारखाने यांनी ही प्रथा सुरु केली. तेव्हापासून भिंगारच्या कलगीतुऱ्याची गादी कलगीवाल्या शाहिराची आहे असे सांगितले जाते.

बाजीराव पेशव्यांच्या ताब्यात नगरचा भुईकोट किल्ला आला. तेव्हा ते भिंगारला आले. त्यांचे वास्तव्य भिंगार मधील ब्राम्हण गल्लीतील सावकार मुळे वाड्यात असायचे. तिथे पेशव्यांनी गणपती स्थापन केला. तो आजही पहावयास मिळतो. त्यास पेशव्यांचा राजवाडा असे देखील पूर्वी म्हणत असत. या वाड्यात पेशव्यासाठी मनोरंजनाचे कार्यक्रम होत असत.

पेशव्यांना शाहिरीची आवड असल्याने त्यांच्या सोबत पुण्याचे शाहीर सातोबा शिलारखाने हे असत. तसेच लष्करी अधिकारी, सैनिक घोडदळ पायदळ असायचे. सैन्याला लागणारी हत्यारे, घोड्यांची नालं आणि इतर लोखंडी वस्तू बनवण्यासाठी लोहार कारागीर सोबत येत असत. ब्राह्मण गल्ली शेजारीच त्यांची वसाहत उभारली जायची. याच जागेला आता लोहार गल्ली म्हणून ओळखले जाते.

येथील जुन्या वास्तू, गल्ल्या आणि परिसर बदलत चालले तरी स्थानिकांनी मौखिक परंपरा लोक स्मृती माध्यमातून सातोबाचा कोपरा हे नाव आणि त्यामागचा इतिहास जिवंत ठेवला आहे. (आजचा नेहरू चौक) या गावात कोष्टी समाजाचा वस्त्रोद्योग मोठ्या प्रमाणावर होता. ते कारागीर देखील येथे रहात होते. या सर्वांच्या मनोरंजनासाठी हा कलगीतुरा कार्यक्रम पेशव्यांच्या काळात सुरु झाल्याचे जाणकार सांगतात.

घन:श्याम सुंदरा श्रीधरा अरुणोदय झाला ही भुपाळी लिहिणारे पुण्याचे लिंगायत गवळी समाजातील प्रसिद्ध शाहीर होनाजी शिलारखाने यांचे आजोबा शाहीर सातोबा शिलारखाने याच भागात त्यांचे वास्तव्य होते. त्यामुळेच या भागाला सातोबाचा कोपरा असे म्हणतात.

त्याकाळी मनोरंजन व प्रबोधनाची साधने मर्यादित होती. कलगी आणि तुरा यांच्यामध्ये अध्यात्म तत्वज्ञान आणि व्यवहारिक ज्ञानावर आधारित सवाल जवाब या कोपऱ्यावर मोकळ्या मैदानात हा फड रंगत होता. असे पूर्वीपासून सांगितले जाते. येथील कलगीतुरा कार्यक्रमास महाराष्ट्रातील अनेक नामवंत शाहिरांनी हजेरी लावलेली आहे.

शाहीर सातोबा यांनी ही परंपरा येथे सुरु केल्याने भिंगार व पंचक्रोशीत अनेक शाहीर तयार झाले होते. भिंगार कलगीतुऱ्याची गादी कलगीवाल्याची असल्याने कार्यक्रमास सुरुवात करताना स्थानिक कलगीवाले शाहीर यांना तो मान असायचा. योगायोग असा की याच सातोबाच्या कोपऱ्यावर रहाणारे लिंगायत गवळी समाजातील अलिकडील काळातील कलगीवाले शाहीर चिमाजी लालबोंद्रे हे या गावातील शेवटचे शाहीर होते. ते येथील कलगीतुरा कार्यक्रम सुरु करीत असत.

पूर्वीच्या सातोबाच्या कोपऱ्यावर होणारा कलगीतुरा कार्यक्रम आता सरपण गल्लीत होत आहे. याभागातील कार्यक्रम दगडूतेली व मित्र परिवाराने सुरु केल्याचे सांगितले जाते.

# सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये विद्यार्थ्यांना स्वच्छतेचे धडे



नगर – महाराष्ट्र राज्य स्वच्छता अभियानांतर्गत सेंट विवेकानंद प्रायमरी स्कूलमध्ये अहिल्यानगर महानगरपालिकेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी स्वच्छता व घनकचरा व्यवस्थापन या विषयावर मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमात मनपाच्या–वतीने सौ. सुवर्णा वाघ यांनी आता दुसरी आणि तिसरीच्या विद्यार्थ्यांशी सुसंवाद साधत स्वच्छतेचे महत्त्व, कचऱ्याचे विविध प्रकार, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण, स्वच्छतेच्या चांगल्या सवयी आणि '७ आर' संकल्पना यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. तसेच कचऱ्याची निर्मिती झाल्यापासून त्याच्या अंतिम व्यवस्थापनापर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांना सोप्या भाषेत समजावून सांगितला. दैनंदिन जीवनात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे, ओला व सुका कचरा वेगवेगळा करणे, कचऱ्याचा पुनर्वापर व पुनर्चक्रण करणे आणि आपला परिसर स्वच्छ ठेवणे या बाबींवर त्यांनी विशेष भर दिला. प्रश्नोत्तरांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांशी संवाद साधल्यामुळे विद्यार्थ्यांना घनकचरा व्यवस्थापनाची संकल्पना अधिक स्पष्टपणे समजली.

याप्रसंगी शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांनी आपल्या मनोगतातून स्वच्छतेचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, स्वच्छता ही केवळ आपल्या घरापुरती किंवा शाळेपुरती मर्यादित नसून ती प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. लहानपणापासूनच विद्यार्थ्यांनी स्वच्छतेच्या चांगल्या सवयी अंगीकाराव्यात, कचऱ्याचे योग्य वर्गीकरण करावे आणि पर्यावरणाच्या रक्षणासाठी स्वतः पुढाकार घ्यावा. विद्यार्थ्यांनी स्वतः स्वच्छतेचे पालन करण्याबरोबरच आपल्या कुटुंबीयांनाही याबाबत जागरूक करावे, असे आवाहन त्यांनी केले.

पर्यावरणाचे संरक्षण, प्रदूषणावर नियंत्रण आणि स्वच्छ परिसराची निर्मिती करण्यासाठी प्रत्येकाने सक्रिय सहभाग घेणे आवश्यक आहे, हा महत्त्वपूर्ण संदेश या कार्यक्रमातून देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये स्वच्छतेविषयी जागरूकता निर्माण होऊन पर्यावरणपूरक सवयी जोपासण्यास प्रेरणा मिळाली.

या कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी सौ. अश्विनी देशपांडे, सौ. चांदनी सोनाग्रा, सौ. प्रियांका चारगुंडी, सौ. नम्रता कुकरेजा, सौ. पूजा चोपडा, सौ. अनामिका म्हस्के, सौ. शुभांगी पाखरे तसेच शिक्षकवृंद व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ **दिवसाचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्राचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

**ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता.१२/१०/२०२६.**

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे शहर अहिल्यानगर येथील** खालील वर्णनाची जागेसह बांधकाम केलेली मिळकत –

**सिटी सर्व्हे नंबर २/क याचा म्यु.घर नं.२०२क चे एकुण क्षेत्रफळ ५०.२० चौ.मीटर यापैकी पुर्व बाजुकडील जागा क्षेत्र १२.५५ चौ.मी. (१३५.०० चौ.फुट) व त्यावरील तळ मजला व पहिल्या मजल्याचे एकुण बांधकाम क्षेत्र ११.३८ चौ.मी. (१२२.०० चौ.फुट) त्यामधील तदंगभूत वस्तुंसह काही एक राखुन न ठेवीता दरोबस्त संपुर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा**

पुर्वस : सि.स.नं.२ पैकी सायबा अमृततुल्य दक्षिणेस : दिल्लीगेट पटांगण गल्ली

पश्चिमेस :सि.स.नं.२/क पैकी भरत रामचंद्र कुलकर्णी यांची मिळकत उत्तरेस : रस्ता

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**

**१. संजय सुरेशराव ढोणे,** रा.साई मंदिर जवळ, ६९१५, लोणार गल्ली, सर्जेपुरा, अहिल्यानगर. **२. इम्रान अयाज शेख,** रा.मारुती मंदिर जवळ, सर्जेपुरा, गोकुळवाडी, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**

पत्ता :– ऑफीस नं.५, पहिला मजला, साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहिल्यानगर. मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९


# नवरात्रोत्सवात महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करा

### नगरसेवक डॉ. सागर बोरुडे यांचे निर्देश; आरोग्य योजनांची माहिती शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्याचे आवाहन

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय, माळीवाडा यांच्या वतीने एकात्मिक आरोग्य समितीची बैठक नगरसेवक तथा चार प्रभाग समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. एकात्मिक आरोग्य समितीचे अध्यक्ष आमदार संग्राम जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या बैठकीत शहरातील नागरिकांना पुरविण्यात येणाऱ्या आरोग्य सुविधांचा आढावा घेण्यात आला. तसेच आरोग्यसेवेचे नियोजन करून विविध आरोग्य सुविधा नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत चर्चा करण्यात आली.



अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग समिती कार्यालय, माळीवाडा यांच्या वतीने एकात्मिक आरोग्य समितीची बैठक नगरसेवक तथा चार प्रभाग समितीचे अध्यक्ष डॉ. सागर बोरुडे यांच्या अध्यक्षतेखाली झाली. (छायाचित्र – लहू दळवी)

यावेळी डॉ. सागर बोरुडे म्हणाले की, नवरात्रोत्सव सुरू झाला असून या काळात गर्दीच्या ठिकाणी मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करावे. या शिबिरांच्या माध्यमातून महिलांच्या आरोग्याची तपासणी करून संभाव्य आजारांचे निदान करावे आणि त्यांना योग्य वैद्यकीय सल्ला द्यावा. धकाधकीच्या जीवनात अनेक महिला आपल्या आरोग्याकडे दुर्लक्ष करतात. काही महिला आजार अंगावर काढत असल्याने त्यांना पुढे विविध आरोग्य समस्यांना सामोरे जावे लागते. त्यामुळे महिलांच्या आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करून वेळेवर तपासणी व उपचारांचे महत्त्व पटवून देणे आवश्यक आहे.

आरोग्य विभागातील डॉक्टर, आरोग्यसेविका आणि आशासेविकांनी आपल्या कामाचे स्वरूप व अधिकार समजून घेऊन जबाबदारीने काम करावे. त्यातून नागरिकांना अधिक चांगल्या आरोग्य सुविधा देता येतील. महानगरपालिकेच्या आरोग्यसेवांमुळे गरीब कुटुंबांची आर्थिक बचत होण्यास मदत होते. शेवटच्या घटकापर्यंत आरोग्य सुविधा पोहोचविण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील, असे डॉ. बोरुडे यांनी सांगितले.

महानगरपालिकेचे आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर म्हणाले की, महापालिकेच्या माध्यमातून प्रसूतीसाठी महिलांना घरून रुग्णालयात आणण्यासाठी मोफत रुग्णवाहिकेची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. तसेच प्रसूतीनंतर महिलेला घरी पोहोचविण्याची व्यवस्थाही केली जाते. या सुविधेची माहिती आशासेविकांनी नागरिकांपर्यंत पोहोचवावी. महानगरपालिकेच्या माध्यमातून लहान बालकांचे लसीकरण, मोफत आरोग्यसेवा आणि औषधांची सुविधा उपलब्ध करून दिली जाते. या सेवांची माहिती सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे गरजेचे आहे. आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना निरंतर सेवा द्यावी लागते. या कामात वेळेचे बंधन नसल्याने प्रत्येकाने आपले कर्तव्य प्रामाणिकपणे पार पाडावे आणि नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा देण्याचा प्रयत्न करावा. कै. बाळासाहेब देशपांडे दवाखान्याच्या माध्यमातून दिल्या जाणाऱ्या आरोग्यसेवेची माहिती जनतेपर्यंत पोहोचवून अधिकाधिक नागरिकांनी या सुविधांचा लाभ घ्यावा, असे आवाहन डॉ. राजुरकर यांनी केले.

बैठकीस आरोग्य अधिकारी डॉ. सतीश राजुरकर, डॉ. सृष्टी बनसोडे, डॉ. वृषाली आरु, डॉ. कंचन रच्चा, डॉ. गौरव देशमुख, डॉ. साहिल शेख, विकास गीते यांच्यासह आरोग्य विभागातील डॉक्टर, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते


## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही ''अलाईड एन के हाईटर्स'' यांचे भागीदार १) जयकिसन जानिमल नवलानी, २).राजकुमार लक्ष्मणदास नवलानी, ३) पुरुषोत्तम भारुमल कुकरेजा ४) संकेत सतिश वाधवणे हे चार भागीदार या मिळकतीचे विद्यमान मालक असुन यातील नं.१ व ३ हे राहणार साई अंगण अपार्टमेंट, कुष्ठधाम रोड, सावेडी, अहिल्यानगर येथे राहत असुन नं.२ हे बालीकाश्रम रोड,अहिल्यानगर तसेच नं.४ हे गुलमोहर रोड,सावेडी,अहिल्यानगर येथे राहत असुन सदरची मिळकत ही अलाईड एन के हाईटर्स यांचे वर नमुद केलेले भागीदार यांच्या मालकी वहिवाटीची असुन त्यांचे प्रत्यक्ष कब्जात आहे. ''अलाईड एन के हाईटर्स'' यांचे भागीदार विद्यमान मालक यांनी अलाईड एन के हाईटस मौजे भिस्तबाग येथील नियोजित इमारतीतील ग्राऊंड फ्लोअर वरील दुकान/शॉप नंबर ०४ ही मिळकत आमचे अशिलास कायमखुश खरेदी द्यायचे मान्य व कबुल केलेले आहे. सदर व्यवहारापोटी विद्यमान मालक यांनी सदर शॉप क्र.०४ चे नोटरी मार्फत साठेखत केले आहे. त्याचा नंबर SRNO.SSW/NT.१५९/२०२६ दिनांक ०१/१०/२०२६असा आहे. विद्यमान मालक यांनी विसारापोटी आमचे अशिलाकडून मोठी रक्कम घेतलेली असुन सदर मिळकत लवकरच आमचे अशिलास खरेदी देण्याचे ठरविले आहे.

सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे,असे मिळकतीच्या मालकाचे म्हणणे आहे.परंतु कोणाचीही तक्रार राहु नये म्हणून या जाहीर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,सदर मिळकती बाबत कोणताही चालु वाद असल्यास अथवा कोणत्याही बँकेचे कर्ज, गहाण, दान, खरेदीखत, वारसहक्क, बक्षीसपत्र, मनाई हुकूम, दावा, कोर्ट कारवाई, स्थगिती, पोटगी चार्ज, लीन, इजमेंट,अव्वल जप्ती, भाडेकरार, साठेकरार, मदार असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाले पासुन १५ दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्यावर समक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी.वरील मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास ज्याचे काही हक्क,हितसंबंध आहेत ते त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील,मग कोणाचीही कसलीही तक्रार, हरकत चालणार नाही यांची नोंद घ्यावी.

मिळकतीचे वर्णन:–जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगर पैकी,अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील,मौजे भिस्तबाग येथील खालील वर्णनाची मिळकत.

सर्व्हे नं.१२/२९/१२२/अ मधील खालील वर्णनाच्या बिगरशेती खुले प्लॉट :–

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ. मीटर | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिण | पश्चिम | उत्तर |
| अ –१०८ | ३०४.०४ | प्लॉट नं. बी. ६३ | शिव रोड | रस्ता | प्लॉट नं.अ–१०९ |
| अ– १०९ | २४३.११ | प्लॉट नं. बी. ६२ | प्लॉट नं. अ– १०८ | रस्ता | रस्ता |

**या वर बांधावयाची नियोजित इमारत ''एन के हाईटर्स'' या पैकी** ग्राऊंड फ्लोअर वरील शॉप नंबर ०४ चे कारपेट क्षेत्र १६७.०२ चौ.फुट व लोडींग क्षेत्र ५८.०६ चौ.फुट याचे सेलेबल क्षेत्र २२५.०० चौ.फुट (कारपेट क्षेत्र Xl.३५) ही दुकान मिळकत विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांना कायमखुष खरेदीने द्यावयाचे ठरले आहे. याची चतु:सिमा :–

| पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
|---|---|---|---|
| रिअर मार्जिन | शॉप नं. ०५ | बिल्डिंग सेट बॅक व पुढे रस्ता | शॉप नं. ०३ |

येणे प्रमाणे चतु:सीमा पुर्वक मिळकत असे.

सदर मिळकतीचे विद्यमान मालक:–अलाईड ''एन के हाईटर्स''यांचे भागीदार श्री.जयकिसन जानिमल नवलानी, व इतर.रा.अहिल्यानगर.

ठिकाण :–अहिल्यानगर. दिनांक :– १२/१०/२०२६

**ॲड. शामसुंदर राधाकृष्ण दळवी** (बी.कॉम,एलएल.बी.डीएलएलएल.डब्ल्यू.)

पत्ता:– प्लॉट नं.११४अे,जिजामाता कॉलनी,भिस्तबाग,पाईपलाईन रोड, सावेडी, अहमदनगर.पिन. ४१४००३.(मोबा.९४२२७२७८३४)

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या नोटीसी व्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली मिळकत ही आमचे अशिल शेख असलम बाबासाहेब यांचे मालकीची आहे, सदर मिळकती बाबत आमचे अशिलांने मे. दिवाणी न्यायालयात स्पे.मु.न. ६२/२००३ चा दाखल केलेला होता, सदर दावा रद्द झाल्याने आमचे अशिलांने मे. जिल्हा न्यायालयात रे. सिव्हील अपिल क्र. २६५/२०२४ चा दाखल केलेला आहे. सदर अपिला मध्ये मनाई हुकूमाचा अर्ज नामंजूर झाल्यावर **ना. मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठ येथे सिव्हील ॲप्लिकेशन नं. ७३६३/२०२५ दाखल केला व A.O ६२/२०२५ चा दाखल केलेला आहे व त्यामध्ये दि. २२.०९.२०२५ रोजी ना. उच्च न्यायालयाने सदर मिळकती मध्ये पक्षकारांनी कोणतेही तिऱ्हाईत इसमांचे हक्क हितसंबंध प्रस्थापीत करू नये असा मनाई हुकूम दिलेला आहे.** असे असतांना सदर केसमधील प्रतिवादी सुभाष पन्नालाल शाह व हर्षद सुभाष शाह यांनी बेकायदेशीररित्या सदर मिळकती बाबत दि. ०४.१०.२०२५ रोजी दस्त क्र. ७०७०/२०२५ प्रमाणे चैताली जितेंद्र गाढे व जितेंद्र सुर्यकांत गाढे यांना खरेदीखत करून दिलेले आहे. सदर खरेदीखत हे मे. कोर्टाचा मनाईहुकूम अस्तित्वात असतांना घेण्यात आलेले असल्याने ते बेकायदेशीर आहे व खरेदी घेणार यांना मिळकती मध्ये कोणतेही हक्क, अधिकार प्राप्त झालेले नाही. सबब या जाहीर नोटीसी व्दारे तमाम लोकांस सुचीत करण्यात येते की, परिशिष्टातील मिळकती संबंधाने कुणीही कोणत्याही प्रकाराचा व्यवहार करू नये, याउपरही कुणीही तसे केल्यास त्यास आमचे अशिलांची सक्त हरकत आहे, सदर व्यवहार करणारा यांस मिळकती मध्ये क्लिअर टायटल मिळणार नाही व मिळकतीचा ताबेकब्जा ही मिळणार नाही, व सदरचा व्यवहार आमच्या अशिलावर बंधनकारक राहणार नाही, याची सर्वांनी नोंद घ्यावी. सबब कुणाचीही फसवणुक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस दिली असे.

**परिशिष्ट**

जिल्हा तुकडी अहिल्यानगर पोट तुकडी व तालुका नगर पैकी मौजे सावेडी येथील महानगरपालिका हद्दीतील मिळकत त्याचा जुना सर्व्हे नं. १६६ टि. पी. स्कीम नं. ४, फायनल प्लॉट नं. १३०, चे क्षेत्र ८ एकर १३ गुंठे चे ३३०२६.५ चौ.मी यापैकी क्षेत्र २३०२६.५२ चौ.मी. ही सर्व मिळकत व विशेषतः त्यामधील सबप्लॉट नं. ५२,५३ व ५४ चे क्षेत्र ८३१.६० चौ.मी.

**यांसी चतु:सिमा**

पुर्वेस– स. नं. १५७ दक्षिणेस– स. नं. १६५

पश्चिमेस– स. नं. १७५, १७६ व फा. प्लॉ. पै. दत्त देवस्थानची जागा

उत्तरेस– स. नं. १६७ मधील रस्ता

येणेप्रमाणे चतु:सिमा पुर्वक मिळकत तदंगभुत वस्तुंसह काही एक राखून न ठेविता.

दिनांक– १२/१०/२०२६, अहिल्यानगर

**ॲड. जावेद ए. खान**

रा. ४९, कहकशा बंगला, मौलाना आझाद शाळेजवळ, इरीगेशन, ऑफिस मागे, अहमदनगर, मो. ९२७०६७७२०१

## जाहीर नोटीस

तमाम लोकास या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की खालील परिशिष्ठात वर्णन केलेली प्लॉट मिळकत ही विद्यमान मालक **एकनाथ दगडू भगत रा. मु.पो.शेंडी ता.जि.अहिल्यानगर** यांचे मालकी वहीवाटीची आहे.सदर प्लॉट मिळकत त्यांच्या प्रत्यक्ष कब्जात आहे, खाली नमुद केलेल्या प्लॉट मिळकतीचा विक्रीचा व्यवहार आमच्या आशिलाबरोबर ठरला असून आमच्या आशिलाकडून विद्यमान मालक यांनी विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर प्लॉट मिळकत निर्वेध, निजोखमी व बोजाविरहित आहे असे खरेदी देणाराचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहिर नोटीस द्वारे कळविण्यात येते की, खाली नमुद मिळकत बाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा साठेखत, खरेदीखत, गहाणखत,दान, वारस हक्क, बक्षीस पत्र, मनाई हुकुम, दावा, कोर्ट कारवाई, अन्न, वस्त्र, लीज इ अगर कोणताही कसलाही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन **सात (७)** दिवसाचे आत योग्य त्या कागदोपत्री व पुराव्यासह खालील पत्त्यावर प्रत्यक्ष आणुन दाखवून आमची खात्री करुन द्यावी. अन्यथा मुदतीत कोणाची कोणतीही हरकत न आल्यास सदर प्लॉट मिळकत निर्वेध व निजोखमी आहेत असे समजुन खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व त्यानंतर कोणाचीही कोणतीही तक्रार चालणार नाही त्याची नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन :**– डि।। अहिल्यानगर सब डि!। तालुका नगरपैकी ग्रामपंचायत हद्दीतील तसेच मा. दुय्यम निबंधक साहेब, अहिल्यानगर यांचे कार्यक्षेत्रातील मौजे शेंडी येथील गट नं. ३८३/१ मधील प्लॉट नं. ३४ याचे एकूण क्षेत्र १३३.०८ चौ. मी. ही संपूर्ण प्लॉट मिळकत.

**यांसी चतु:सिमा**

पुर्वेस– प्लॉट नं. ४५ दक्षिणेस– प्लॉट नं. ३३

पश्चिमेस– ९ मी. रस्ता उत्तरेस– प्लॉट नं. ३५

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक संपुर्ण प्लॉट मिळकत व तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणुकीचे हक्कासह काहीही एक राखून न ठेविता असे

अहमदनगर, दिनांक– १२/१०/२०२६

**ॲड. सुनिल गोरक्षनाथ हरीश्चंद्रे**

**ॲड. ओंकार पंडीत मोरे**

ऑफिस– गाळा नं. ४, महालक्ष्मी चेंबर्स, पाईपलाईन रोड, सावेडी, अहिल्यानगर. मो.नं. ९८६०६४६४६३


# नगर शहरात १५ ऑक्टोबरला 'दांडिया नाईट'

नगर – शारदीयम नवरात्र उत्सवानिमित्त शहरातील जिव्हाळा ग्रुप आयोजित व महावीर ग्रुप प्रायोजित दांडिया नाईटचे १५ ऑक्टोबर संध्याकाळी टिळकरोड येथील नंदनवन लॉन येथे आयोजन करण्यात आले आहे. या दांडिया नाईटमध्ये सहभागी होण्याचे आवाहन जिव्हाळा ग्रुपच्या अध्यक्षा अल्पना कासवा व सविता काळे यांनी केले आहे.

यामध्ये बेस्ट सोलो डान्सर, बेस्ट कपल डान्स, बेस्ट ड्रेसअप, बेस्ट ग्रुप डान्स, बेस्ट किडस् डान्सरचे आकर्षक बक्षिस देण्यात येणार आहे. तर मिस व मिस्टर जिव्हाळा हे विशेष पुरस्कार यावर्षी ठेवण्यात आले आहे. याचे वैशिष्टये म्हणजे नॉन स्टॉप म्युझिक लाईट, डीजे, एलईडी वॉल स्टेज आणि फूड काउंटर्स राहणार आहे. तसेच भाग्यवान विजेत्यांना कुपनच्या लकी ड्रॉ द्वारे बक्षिसे, महिलांना पैठणी साडीसह सोने व चांदीचे बक्षीस दिले जाणार आहे.

# अर्थजगत




■ माहीत आहे?

## सोने घसरणीच्या काळात दागिना घ्यावा की गोल्ड ईटीएफ?

**सोन्याचा भाव २९ सप्टेंबरला १,४०० रुपयांनी घसरून १,४८,६०० प्रति १० ग्रॅम झाला. भाव खाली आला. या घसरणीचा फायदा घेण्यासाठी खरेदीची घाई करण्यापूर्वी एक मुद्दा आधी स्वतःला विचारा की, ह्सोने वापरण्यासाठी घ्यायचे आहे की गुंतवणुकीसाठी?**

सोन्याच्या भावातील मोठ्या चढ–उताराने पुन्हा खरेदीदारांचे लक्ष वेधले आहे. २९ सप्टेंबरला दिल्लीत ९९.९ टक्के शुद्ध सोन्याचा भाव १,४०० रुपयांनी घसरून १,४८,६०० रुपये प्रति १० ग्रॅम झाला. २ महिन्यांत प्रथमच भाव १.५० लाखांच्या खाली आला. आंतरराष्ट्रीय बाजारात त्याआधीच्या सत्रात सोन्यात सुमारे ४ टक्के घसरण झाली होती. सप्टेंबरमध्ये जागतिक सोन्याचा भाव सुमारे ७ टक्क्यांनी खाली आला. भावातील घसरण पाहून दागिने खरेदी करावेत की गोल्ड ईटीएफमध्ये पैसे गुंतवावेत, असा प्रश्न पडू शकतो. प्रत्यक्षात या दोन्ही खरेदींचा उद्देश वेगळा आहे.

**■ दागिना म्हणजे पूर्णपणे गुंतवणूक नाही**

लग्न, सण किंवा वापरासाठी सोने हवे असेल तर दागिना घेण्याला पर्याय नाही. मात्र त्याकडे शुद्ध गुंतवणूक म्हणून पाहताना खर्चाचे गणित बदलते. दागिना घेताना सोन्याच्या किमतीबरोबर मेकिंग चार्ज, जीएसटी आणि डिझाइननुसार इतर खर्च येतात. पुढे तोच दागिना विकताना किंवा बदलताना संपूर्ण मेकिंग चार्ज परत मिळत नाही. शुद्धता आणि दुकानाच्या बायबॅक धोरणाचाही अंतिम रकमेत परिणाम होतो. म्हणून सोन्याचा बाजारभाव १० टक्क्यांनी वाढला म्हणजे दागिन्यावरही ग्राहकाला लगेच १० टक्के निव्वळ नफा झाला, असे म्हणता येत नाही.

**■ गुंतवणुकीसाठी ईटीएफचे वेगळे गणित**

गोल्ड ईटीएफ शेअर बाजारात व्यवहार होणाऱ्या युनिटच्या स्वरूपात सोन्यात गुंतवणूक करण्याची सोय देतो. प्रत्यक्ष सोने सांभाळण्याची, लॉकर घेण्याची किंवा शुद्धता तपासण्याची गरज नसते. मात्र ईटीएफला व्यवस्थापन खर्च असतो आणि डीमॅट व ब्रोकिंगशी संबंधित खर्चही विचारात घ्यावा लागतो. २८ सप्टेंबरच्या घसरणीत काही गोल्ड आणि सिल्व्हर ईटीएफ ३.६ टक्क्यांपर्यंत खाली आले होते. म्हणजे ईटीएफ घेतला म्हणून सोन्याच्या भावातील अस्थिरता नाहीशी होत नाही; बाजारभावातील बदल त्यातही दिसतो.

**■ घसरण म्हणजे खरेदीचा संकेत?**

एका दिवसाची १,४००ची घसरण हा स्वतःमध्ये गुंतवणुकीचा निर्णय घेण्याचा पुरेसा आधार नाही. आपल्या एकूण गुंतवणुकीत सोन्याचे प्रमाण किती आहे, पैसे किती काळासाठी गुंतवायचे आहेत आणि खरेदीचा उद्देश काय आहे, हे अधिक महत्त्वाचे. वापरण्यासाठी सोने हवे असेल तर दागिना; संपत्तीच्या पोर्टफोलिओत सोने ठेवायचे असेल तर ईटीएफसारख्या पर्यायाचे खर्च आणि तरलता तपासणे, एवढा फरक स्पष्ट ठेवला तर भावातील रोजच्या चढ–उतारामागे धावण्याची गरज उरत नाही. ◆◆◆

**आरोग्य विम्यात पहिल्या वर्षाचे कमिशन १५ टक्क्यांपर्यंत, तर जीवन विम्यात २० टक्क्यांपर्यंत मर्यादित करण्याचा प्रस्ताव आहे. हा बदल लागू झाल्यास विमा विक्रीची पद्धत, पॉलिसीचा खर्च आणि ग्राहकाला दिला जाणारा सल्ला या तिन्हींवर परिणाम होऊ शकतो.**

## ‘ईर्डा’चा प्रस्ताव; पॉलिसीधारकांना फायदा काय?

■ अर्थ विशेष




विमा घेताना आपण प्रीमियम किती, संरक्षण किती आणि पॉलिसीत कोणते लाभ आहेत हे पाहतो. मात्र आपण भरलेल्या प्रीमियममधून पॉलिसी विकणाऱ्या एजंट, बँक किंवा ब्रोकरला किती कमिशन मिळते, याकडे फारसे लक्ष जात नाही. आता याच कमिशनच्या रचनेत मोठा बदल करण्याची तयारी सुरू झाली आहे.

विमा नियामक आयआरडीएआयने वितरण खर्च आणि कमिशनवर पुन्हा मर्यादा आणण्याचा प्रस्ताव मांडला आहे. आरोग्य विम्यात पहिल्या वर्षी कमाल १५ टक्के, तर जीवन विम्यात उत्पादनाच्या स्वरूपानुसार पहिल्या वर्षी कमिशनची मर्यादा ५ ते २० टक्क्यांच्या दरम्यान ठेवण्याचा प्रस्ताव आहे. नवीन वाहनांच्या थर्ड–पार्टी मोटार विम्यावर कमिशन न देण्याचाही विचार आहे. या प्रस्तावांवर २५ ऑक्टोबरपर्यंत अभिप्राय मागविण्यात आला आहे. त्यामुळे हे नियम अद्याप अंतिम झालेले नाहीत.

**■ कमिशनचा ग्राहकांशी संबंध काय?**

विमा व्यवसायात एजंट आणि बँकांचे जाळे महत्त्वाचे आहे. ग्राहकापर्यंत पॉलिसी पोहोचविण्यासाठी विमा कंपनीला त्यांना मोबदला द्यावा लागतो. मात्र पहिल्या वर्षीच मोठे कमिशन मिळत असल्यास ग्राहकाच्या गरजेपेक्षा जास्त कमिशन देणारी पॉलिसी विकण्याचे आकर्षण निर्माण होऊ शकते. यालाच विमा क्षेत्रात ‘मिस–सेलिंग’ची जोखीम म्हटले जाते.

उदाहरणार्थ, ग्राहकाला साध्या टर्म विम्याची गरज असताना त्याला बचत किंवा गुंतवणूक जोडलेली अधिक महाग पॉलिसी सुचविली जाऊ शकते. नियामकाला वितरणातील अशा प्रोत्साहनांची रचना बदलायची आहे. २०२३मध्ये कमिशनवरील उत्पादननिहाय मर्यादा हटविण्यात आल्या होत्या. त्यानंतर वितरकांना दिल्या जाणाऱ्या मोबदल्यातील वाढ प्रीमियमच्या वाढीपेक्षा वेगवान झाल्याचे नियामकाच्या निरीक्षणातून समोर आले. प्रस्तावित बदल त्याच पार्श्वभूमीवर आले आहेत.

**■ प्रीमियम लगेच कमी होईल का?**

कमिशनची मर्यादा कमी झाली म्हणजे दुसऱ्या दिवसापासून पॉलिसीचा प्रीमियम कमी होईल, असे सरळ गणित नाही. विम्याची किंमत ठरविताना दावा खर्च, व्यवस्थापन खर्च, पुनर्विमा, जोखीम आणि इतर अनेक घटक विचारात घेतले जातात. वितरण खर्च कमी झाल्यास विमा कंपन्यांकडे किंमत अधिक स्पर्धात्मक ठेवण्यास वाव निर्माण होऊ शकतो. जीवन विम्यात कमिशनचा मोठा हिस्सा पहिल्या वर्षी देण्याऐवजी पॉलिसीच्या कालावधीत विभागून देण्याचाही प्रस्ताव आहे. त्यामुळे एजंटचे लक्ष नवी पॉलिसी विकण्याबरोबर ती दीर्घकाळ सुरू राहण्याकडे वळू शकते.

ग्राहकांनी आता पॉलिसी घेताना ‘मला ही पॉलिसी का सुचविली जात आहे?’ हा प्रश्न जरूर विचारावा. विमा संरक्षण किती मिळते, अपवाद कोणते, पॉलिसी बंद केल्यास काय होते आणि वितरकाला किती मोबदला मिळतो, या बाबी समजून घेतल्या तर चुकीची पॉलिसी गळ्यात पडण्याचा धोका कमी होऊ शकतो. ◆◆◆

## पगार वाढल्यास एसआयपी वाढवावी का?

**नोकरीच्या सुरुवातीला दोन–पाच हजार रुपयांची एसआयपी पुरेशी वाटू शकते. मात्र पगार दुप्पट होऊनही गुंतवणूक तेवढ्यावरच थांबल्यास वाढूनही संपत्ती मात्र त्यावेगाने वाढत नाही.**

■ गुंतवणूक




दरवर्षी पगारवाढ झाली की घरखर्चाची मर्यादा थोडी सैल होते. नवा फोन, मोठी गाडी, चांगले घर, प्रवास किंवा बाहेर खाण्यावरचा खर्च वाढतो. या वाढीत अनेकदा मागे राहते ती गुंतवणूक. अलीकडे प्रसिद्ध झालेल्या ३ वेगवेगळ्या व्यक्तींच्या आर्थिक प्रवासातून हाच मुद्दा समोर आला.

एका व्यक्तीने पीपीएफ आणि एनपीएससारख्या साध्या पर्यायांतून ३ कोटींपेक्षा अधिक निवृत्ती निधी उभा केला. दुसऱ्याने २,५०० रुपयांच्या सुरुवातीच्या पगारापासून उत्पन्न वाढत गेले तसे एसआयपी आणि मालमत्तेतील गुंतवणूक वाढवून कोटींपेक्षा अधिक मालमत्ता तयार केली. तिसऱ्या उदाहरणात वार्षिक उत्पन्न ८० लाखांपर्यंत पोहोचूनही उत्पन्नाचा स्रोत अचानक बंद झाल्यानंतर आर्थिक अडचण निर्माण झाली. धडा एकचङमोठा पगार आणि मोठी संपत्ती या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. :

**■ पाच हजारांची एसआयपी किती वाढेल?** : समजा, वयाच्या ३०व्या वर्षी ५,००० रुपयांची मासिक एसआयपी सुरू केली आणि पुढील २० वर्षे तीच रक्कम कायम ठेवली. वार्षिक सरासरी १२ टक्के परतावा गृहीत धरल्यास २० वर्षांनी सुमारे ५० लाखांचा निधी तयार होऊ शकतो. हा परतावा हमीचा नाही; गणित समजण्यासाठी घेतलेले गृहीतक आहे. पण दरवर्षी एसआयपीमध्ये १० टक्के वाढ केली तर चित्र लक्षणीय बदलते. पहिल्या वर्षी ५,००० रुपये, दुसऱ्या वर्षी ५,५०० रुपये, तिसऱ्या वर्षी ६,०५० रुपयेअशी गुंतवणूक वाढत जाते. पगारवाढीचा काही भाग गुंतवणुकीकडे वळल्यामुळे दीर्घ काळात चक्रवाढीला अधिक मोठी रक्कम मिळते. ◆◆◆

**■ पगारवाढीचा नियम ठरवा**

पगार १० टक्के वाढला म्हणून जीवनशैलीचा खर्चही १० टक्के वाढविण्याची गरज नसते. वाढलेल्या उत्पन्नातील ठरावीक हिस्सा आधी गुंतवणुकीकडे वळवता येतो. उदाहरणार्थ, मासिक पगार ५०,००० रुपयांवरून ५५,००० झाला तर वाढीव ५,०००पैकी २,००० एसआयपीत टाकण्याचा नियम करता येईल. पुढील वेतनवाढीतही तोच नियम पाळल्यास गुंतवणूक उत्पन्नाबरोबर वाढते.

**■ उत्पन्न थांबण्याचीही तयारी**

संपत्ती तयार करताना केवळ एसआयपी पुरेशी नाही. आपत्कालीन निधी, आरोग्य विमा आणि योग्य मुदतीचा जीवन विमा यांचीही व्यवस्था आवश्यक आहे. उत्पन्न अचानक कमी झाले तर गुंतवणूक मोडण्याची वेळ येऊ नये, हा त्यामागचा उद्देश. आर्थिक प्रगती मोजताना ‘माझा पगार किती वाढला?’ यापेक्षा ‘पगारवाढीपैकी किती रक्कम मालमत्तेत रूपांतरित झाली?’ हा हिशेब अधिक महत्त्वाचा. कारण वेतन दर महिन्याला मिळते; संपत्ती मात्र वर्षानुवर्षांच्या शिस्तीतून तयार होते.

■ पेन्शन




## एनपीएस घेण्याआधी होणार ‘जोखीम परीक्षा’?

एनपीएसमध्ये कोणती योजना निवडायची यापूर्वी गुंतवणूकदाराची जोखीम घेण्याची क्षमता तपासण्याची व्यवस्था पीएफआरडीए तयार करत आहे. अंतिम निर्णय गुंतवणूकदाराचाच राहणार असला, तरी वय, गुंतवणुकीचा कालावधी आणि जोखीमक्षमता यांच्याशी विसंगत पर्याय निवडण्याची शक्यता कमी करण्याचा प्रयत्न आहे.

नॅशनल पेन्शन सिस्टीममध्ये गुंतवणूक करताना इक्विटी किती ठेवावी, सरकारी रोख्यांत किती पैसे असावेत आणि वयानुसार हे प्रमाण कसे बदलावे, हा अनेकांसाठी कठीण प्रश्न असतो. २५ वर्षांचा तरुण आणि निवृत्तीला ५ वर्षे उरलेली ५५ वर्षांची व्यक्ती एकाच प्रकारची गुंतवणूक निवडत असेल, तर दोघांची जोखीम सारखी राहत नाही.

यावर उपाय म्हणून पेन्शन फंड नियामक पीएफआरडीए ‘सुटेबिलिटी प्लॅटफॉर्म’ आणण्याच्या तयारीत आहे. एनपीएस योजना निवडण्यापूर्वी ग्राहकाला काही प्रश्न विचारून त्याची जोखीम घेण्याची क्षमता समजून घेतली जाईल. ही व्यवस्था पेन्शन फंड, सेंट्रल रेकॉर्डकीपिंग एजन्सी आणि एनपीएस ट्रस्टच्या प्लॅटफॉर्मवर उपलब्ध करण्याचा विचार आहे. अंतिम योजना कोणती निवडायची, याचा अधिकार मात्र ग्राहकाकडेच राहणार आहे.

**वय एकच निकष नाही**

गुंतवणुकीचा दीर्घ कालावधी उपलब्ध असल्यामुळे तरुण गुंतवणूकदार बाजारातील चढ–उतार सहन करू शकतो, असे सामान्यतः मानले जाते. पण वय ३० वर्षे आहे म्हणून प्रत्येकाने जास्तीत जास्त इक्विटीच घ्यावी, असे नाही.

उत्पन्न किती स्थिर आहे, कर्ज किती आहे, आपत्कालीन निधी आहे का, निवृत्ती किती वर्षांनी आहे आणि बाजार २०–३० टक्के घसरला तर गुंतवणूक कायम ठेवण्याची मानसिक व आर्थिक क्षमता आहे का, हेही महत्त्वाचे ठरते.

याउलट ५५ वर्षांच्या व्यक्तीकडे मोठा निवृत्ती निधी, स्वतंत्र उत्पन्न आणि इतर सुरक्षित मालमत्ता असल्यास त्याची जोखीमक्षमता त्याच वयातील दुसऱ्या व्यक्तीपेक्षा वेगळी असू शकते.

**एनपीएसमध्ये आधीपासून पर्याय**

एनपीएसमध्ये ‘ॲक्टिव्ह चॉईस’द्वारे गुंतवणूकदार स्वतः मालमत्ता वाटप करू शकतो. ‘ऑटो चॉइस’ किंवा लाइफ–सायकल पर्यायांमध्ये वयानुसार इक्विटीचे प्रमाण आपोआप बदलत जाते. सध्या जोखीमक्षमतेनुसार ४ लाइफ–सायकल पर्याय उपलब्ध असल्याचे पीएफआरडीएने नमूद केले आहे.

नवी व्यवस्था गुंतवणूकदाराच्या जागी निर्णय घेणार नाही. तिचा उपयोग स्वतःची जोखीमक्षमता समजून घेण्यासाठी होईल. निवृत्तीची गुंतवणूक २०–३० वर्षांची असते. त्यामुळे मागील एका वर्षात कोणत्या एनपीएस योजनेने सर्वाधिक परतावा दिला, एवढ्यावर निवड करणे धोकादायक ठरू शकते. किती परतावा हवा यापूर्वी किती घसरण सहन करू शकतो, हा प्रश्न विचारण्याची सवय लावणे, हा प्रस्तावित व्यवस्थेचा महत्त्वाचा फायदा ठरू शकतो. ◆◆◆

## टॅक्स ऑडिट आणि आयटीआरला मुदतवाढ

करलेखापरीक्षण अहवाल सादर करण्यासाठी आता २१ ऑक्टोबरपर्यंत, तर संबंधित करदात्यांना आयटीआर दाखल करण्यासाठी २१ नोव्हेंबर २०२६पर्यंत वेळ मिळाला आहे. मात्र ही मुदतवाढ प्रत्येक करदात्यासाठी नाही.

आयकर विवरणपत्र भरण्याची मुदत वाढली, अशी बातमी आली की ती सर्व करदात्यांना लागू आहे, असा गैरसमज होतो. केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळाने दिलेली मुदतवाढही अशीच आहे. प्रत्यक्षात ही सवलत मुख्यतः ज्यांच्या खात्यांचे करलेखापरीक्षण करणे आवश्यक आहे अशा करदात्यांशी संबंधित आहे.

आकलन वर्ष २०२६–२७साठी करलेखापरीक्षण अहवाल सादर करण्याची अंतिम तारीख ३० सप्टेंबर २०२६ होती. ती आता २१ ऑक्टोबरपर्यंत वाढविण्यात आली आहे. त्याच्याशी संबंधित करदात्यांच्या आयकर विवरणपत्राची मुदत ३१ ऑक्टोबरवरून २१ नोव्हेंबर २०२६ करण्यात आली आहे.

**■ कोणाला मिळणार अतिरिक्त वेळ?**

व्यवसाय किंवा व्यावसायिक उत्पन्न असलेल्या काही करदात्यांना आयकर कायद्यानुसार खात्यांचे करलेखापरीक्षण करून घ्यावे लागते. उलाढाल आणि व्यवहाराच्या स्वरूपानुसार ही अट लागू होते. कंपन्या तसेच कायद्यानुसार ऑडिट आवश्यक असलेले इतर करदातेही या गटात येऊ शकतात. त्यामुळे २१ नोव्हेंबर ही सर्व पगारदार व्यक्तींची नवी आयटीआर तारीख आहे, असे समजू नये. ज्यांना करलेखापरीक्षण लागू नाही त्यांच्यासाठी त्यांच्या श्रेणीनुसार असलेली मूळ किंवा आधी लागू झालेली अंतिम तारीखच विचारात घ्यावी लागेल.

■ जाणून घ्या




**आधी ऑडिट, मग आयटीआर**

करलेखापरीक्षण असलेल्या प्रकरणात चार्टर्ड अकाउंटंटला खात्यांची तपासणी करून निर्धारित अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने सादर करावा लागतो. त्यातील माहिती आयटीआरशी सुसंगत असणे आवश्यक असते. त्यामुळे ऑडिट अहवाल आणि आयटीआर यांच्या मुदती परस्परांशी जोडलेल्या असतात.

मुदतवाढ मिळाली असली तरी शेवटच्या दिवसापर्यंत थांबणे सोयीचे ठरत नाही. बँक खात्यांचा ताळमेळ, टीडीएस, जीएसटीशी संबंधित माहिती, एआयएस–टीआयएसमधील नोंदी आणि खात्यांच्या पुस्तकातील व्यवहार यात फरक असल्यास तो आधी शोधावा लागतो.

**■ मुदतवाढ म्हणजे कर भरण्याचीही मुदतवाढ?**

हा आणखी एक महत्त्वाचा गैरसमज आहे. आयटीआर दाखल करण्याची तारीख पुढे गेली म्हणून प्रत्येक प्रकारच्या करभरण्याची तारीख आपोआप पुढे जातेच असे नाही. आगाऊ कर, टीडीएस किंवा अन्य देयकांसाठी स्वतंत्र नियम आणि तारखा असतात. उशिराने कर भरल्यास लागू तरतुदींनुसार व्याजाचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. त्यामुळे करदात्याने सर्वप्रथम आपल्याला ऑडिट लागू आहे का आणि २१ नोव्हेंबरची मुदत आपल्यासाठी आहे का, हे निश्चित करावे. तारीख ऐकून निर्णय घेण्यापेक्षा आपली करदात्याची श्रेणी ओळखणे अधिक महत्त्वाचे आहे. ◆◆◆

## सासूने सुनेला पैसे दिले; कर आणि व्याजाचे काय?

**जवळच्या नातेवाईकाकडून मिळालेली भेट करमुक्त असू शकते. मात्र भेट दिलेल्या पैशातून पुढे मिळणारे व्याज, भाडे किंवा अन्य उत्पन्नही भेट घेणाऱ्याच्याच नावावर करपात्र होईल, असे प्रत्येक वेळी नसते. ‘क्लबिंग ऑफ इन्कम’चा नियम येथे महत्त्वाचा ठरतो. समजा, सासूने सुनेला १० लाख रुपये भेट म्हणून दिले. सुनेने ते पैसे मुदत ठेवीत ठेवले आणि वर्षाला ७०,००० रुपये व्याज मिळाले. १० लाख रुपये मिळाले तेव्हा सुनेला भेटीवर आयकर भरावा लागेल का आणि ७०,००० रुपयांच्या व्याजाचा कर कोण भरणार? या दोन प्रश्नांची उत्तरे वेगवेगळी आहेत.**

■ कर रचना



आयकर नियमांमध्ये ठरावीक ‘नातेवाईकां’कडून मिळणाऱ्या भेटींना करातून सवलत आहे. त्यात पती किंवा पत्नीचे आई–वडीलही येतात. त्यामुळे सासू–सासऱ्यांकडून सुनेला मिळालेली भेट केवळ तिची रक्कम ५०,००० रुपयांपेक्षा अधिक आहे म्हणून करपात्र होत नाही. मात्र त्या पैशातून निर्माण होणाऱ्या उत्पन्नासाठी स्वतंत्र ‘क्लबिंग’चे नियम लागू होऊ शकतात.

कोणताही पुरेसा मोबदला न घेता मुलाच्या पत्नीला मालमत्ता किंवा पैसा हस्तांतरित केल्यास त्या मालमत्तेतून मिळणारे उत्पन्न मूळ हस्तांतरण करणाऱ्या व्यक्तीच्या उत्पन्नात समाविष्ट होऊ शकते

**■ १० लाखांचे उदाहरण समजून घ्या**

सासूने सुनेला १० लाख रुपये दिले आणि सुनेने त्याची एफडी केली, असे समजू. एफडीवर वर्षाला ७०,००० रुपये व्याज मिळाले. भेटीचे १० लाख सुनेच्या हातात करपात्र ठरणार नाहीत; परंतु लागू क्लबिंग नियमांनुसार त्या मूळ पैशातून मिळणारे ७०,००० रुपये सासूच्या उत्पन्नात जोडले जाऊ शकतात. याच पैशातून रोखे घेतले, घर विकत घेऊन भाडे मिळविले किंवा अन्य उत्पन्न देणारी मालमत्ता तयार केली तरी व्यवहाराचे स्वरूप तपासावे लागते.

**■ पुढच्या उत्पन्नाचे गणित वेगळे**

क्लबिंगचा नियम मूळ हस्तांतरित मालमत्तेतून निर्माण झालेल्या उत्पन्नावर केंद्रित असतो. त्या उत्पन्नाची पुन्हा गुंतवणूक करून त्यावर पुढे उत्पन्न मिळाले, तर त्याची करपद्धती वेगळी असू शकते. म्हणून मोठ्या कौटुंबिक भेटींचे नियोजन केवळ ‘गिफ्ट टॅक्स लागत नाही’ या एका वाक्यावर करू नये.

**■ कागदपत्रे का हवीत?**

मोठी रक्कम भेट देताना बँकिंग मार्गाने व्यवहार करणे आणि गिफ्ट डीड किंवा व्यवहाराची स्पष्ट नोंद ठेवणे उपयोगाचे ठरते. भेट कोणाकडून, कधी आणि कोणत्या नात्याने मिळाली, याचा पुरावा भविष्यात कर विभागाकडून विचारणा झाल्यास मदत करतो.

कुटुंबातील पैसा एका खात्यातून दुसऱ्या खात्यात हलविणे सोपे आहे. पण मालकी बदलली म्हणजे त्या पैशातून मिळणाऱ्या उत्पन्नावरील कराची जबाबदारीही नेहमीच बदलते असे नाही. मोठी भेट देताना हे गणित आधी तपासलेले बरे. ◆◆◆



गांधी हाउस ऑफ ज्वेल्स बाय गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) यांच्या वतीने अहिल्यानगरकरमध्ये आयोजित आभूषण प्रदर्शनाचा शुभारंभ झाला. (छायाचित्र – लहू दळवी)

# ‘गांधी ज्वेलर्स’च्या ‘आभूषण प्रदर्शनाचा’ शुभारंभ

**७% पासून मेकिंग चार्जेस, सोने-हिरा-कुंदन पोलकीचे खास कलेक्शन**



नगर – पुण्याच्या गांधी हाउस ऑफ ज्वेल्स बाय गांधी ज्वेलर्स (पाबळवाला) यांच्या वतीने अहिल्यानगरकरांसाठी आयोजित करण्यात आलेल्या आभूषण प्रदर्शनाचा १२ ऑक्टोबर रोजी हॉटेल आयरिस प्रीमिअर, अहिल्यानगर येथे शुभारंभ झाला. १२, १३ आणि १४ ऑक्टोबर असे तीन दिवस हे प्रदर्शन सुरू राहणार आहे.

या प्रदर्शनाचे उद्घाटन सौ. धनश्री सुजय विखे पाटील, सौ. शीतल संग्राम जगताप, डॉ. सौ. कल्याणी चौधरी, डॉ. सौ. ज्योत्सना डौले आणि सौ. मंजू सुनील मुनोत यांच्या हस्ते दीपप्रज्वलन व रिबन कापून करण्यात आले. यावेळी सौ. सुधा कांकरिया, सौ. प्राची पाटील, सौ. साधना कांकरिया, सौ. सविता कांकरिया, सौ. मनीषा लोढा आणि सौ. हेमा शेलोत यांची प्रमुख उपस्थिती होती.

१७ वर्षांची विश्वासाची परंपरा असलेल्या गांधी ज्वेलर्सने पुण्याच्या लक्ष्मी रोडवरील ११ हजार चौरस फुटांच्या शोरूमम धील खास कलेक्शन अहिल्यानगरकरांसाठी आणले आहे. प्रदर्शनात शुद्ध सोने, हिरे, कुंदन-पोलकी तसेच पारंपरिक कलाकुसर आणि आधुनिक डिझाइन्सचा अनोखा मिलाफ पाहायला मिळत आहे.

या प्रदर्शनाचे विशेष आकर्षण म्हणजे दागिन्यांवरील मेकिंग चार्जेस केवळ ७% पासून सुरू आहेत. लग्नसराई, सण-समारंभ आणि आयुष्यातील खास क्षणांसाठी दागिने खरेदी करू इच्छिणाऱ्या ग्राहकांना विविध प्रकारचे आकर्षक कलेक्शन एकाच छताखाली प्रत्यक्ष पाहण्याची संधी मिळणार आहे.

गांधी ज्वेलर्सचे संचालक प्रकाश हुकुमचंद गांधी व आशिष प्रकाश गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या प्रदर्शनाला अहिल्यानगरकरांनी भेट देऊन दागिन्यांच्या खास डिझायनर कलेक्शनचा अनुभव घेण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



# गुरुवाणी – ७७
## तीर्थंकरांशी बंध व्हावा

सुधर्मा स्वामींच्या अनुभूतीतील भगवान महावीर इतरांपेक्षा खूप वेगळे आहेत. जसा हत्तींमध्ये ऐरावत आहे तसे त्यांनी तीर्थंकरांची अनुभूती घेतली. त्यांचे अतिसूक्ष्म निरीक्षण आहे. ऐरावत हत्ती चंद्र प्रकाशासारखा शितल आहे. समुद्रावर येणाऱ्या फेसासारखा आहे. पूर्ण पारदर्शक आहे. अशा ऐरावत हत्ती प्रमाणे तीर्थंकर आहेत. तीर्थंकर मिथ्यात्वीमध्येही सिद्ध बनण्याची संभावना पाहतात. तीर्थंकरांचा संघ असे करवून घेण्यासाठी काम करतो. करवून घेणारा असेल तर जो व्यक्ती स्वप्नातही जे करू शकत नाही ते करतो. हनुमानाने लंके पर्यंत उडी मारली पण ते करवून घेणारा जांबूवंत होता. असे करवून घेण्याचे सामर्थ्य ज्याच्यात असते त्याला गजराज म्हणतात. छत्रपती शिवाजी महाराजांनी शेतकऱ्यांकडून काम करवून घेतले. युद्धावेळी शेतकरी नांगर सोडून हातात तलवार घ्यायचे. हरिण सर्वाधिक वेगाने धावतो पण तो पशु आहे. सिंह सुद्धा पशु आहे पण पाशबंद नाही. त्याला पिंजऱ्यात बंदिस्त करू शकता पण बांधू नाही शकत. इंद्रदेव तीर्थंकरांना साधनेवेळी सुरक्षा घेण्याची विनंती करतात. पण तीर्थंकर नकार देतात. दुसऱ्यांच्या खांद्यावर बसून फक्त स्मशानात जाल, स्वतःच्या पायावर चालाल तर ध्येय गाठता येईल. सिंह कोणावर अवलंबून राहत नाही. इतर सगळे प्राणी समूहात राहता, सिंहाचा समूह नसतो. तीर्थंकर भगवान महावीर सिंह आहेत, त्यांना समजण्यासाठीही सिंहाचे काळीज लागते, कोल्ह्याचे नाही. सुधर्मा स्वामी गंगा नदीचे नाव घेतात. गंगोत्री जवळ गंगा नदीचा प्रवाह सूक्ष्म असतो. पण तिच्या प्रवाहात सगळ्यांना सामावून घेण्याचे सामर्थ्य आहे. इतर नद्या फक्त वाहतात. समावून घेण्याचे सामर्थ्य फक्त गंगा नदीत आहे. भगवान महावीर गंगा नदीप्रमाणे बाराही महिने प्रवाहित असतात, सर्वांना सामावून घेणारे. गरूड उंच आकाशात उडताना खूप वेळ पंख न हलवता आरामात विहार करू शकतो. सगळे पक्षी दररोज आपले निरूपयोगी पंख झटकून टाकतात. गरूड मात्र उंचावर जाऊन असे निरूपयोगी पंख स्वतःच्या चोचीने काढतो, तो रक्तबंबाळ होतो. कारण ते पंख खूप पक्के असतात. तुम्हालाही उंच भरारी घ्यायची असेल तर निरूपयोगी पंख उखडून टाकले पाहिजे. तीर्थंकर जेव्हा धर्माची चर्चा करतात तेव्हा सिंह गर्जनेसारखी करतात. अशा तीर्थंकरांशी तुमचा बंध झाला पाहिजे. सिंहाशी बंध केला तरच तुम्ही सिंहाप्रमाणे बनाल. जो आपल्यापेक्षा श्रेष्ठ असेल त्यालाच सहयोगी बनवा. तुमचा सहयोगी कमजोर असेल तर तुम्ही सुद्धा कमजोरच व्हाल.

**– उपाध्याय प्रवर पू. श्री. प्रविणऋषिजी म. सा.**



# गुरुवाणी – ७८
## तीर्थंकरत्व समजून घेणे

तीर्थंकर महावीर यांची श्रद्धा, ज्ञान, शील कसे आहे? या एकाच सामान्य प्रश्नाचे उत्तर सुधर्मा स्वामींनी स्वतःच्या अनुभूतीतून दिले व ते एकाचवेळी तीर्थंकरांना योद्धा आणि कमळाचे फूल संबोधतात. योद्धा आणि कमळ खरं तर वेगवेगळे असतात. योद्ध्यांमध्ये सर्वश्रेष्ठ योद्धा वासुदेव आहे. श्रीकृष्ण वासुदेव अठरा दिवस रात्र विना खातापिता, न थकता निरंतर युद्ध करू शकतात. तीर्थंकर भगवान महावीर सहा महिने संगम देवाच्या प्रत्येक हल्ल्याला पचवतात. आक्रमण करायचे नाही आणि समोरच्याचे आक्रमण सफल होऊ द्यायचे नाही अशी तीर्थंकरांची युद्ध कला आहे. ही कला आपल्यातही येऊ शकते. त्यासाठी आपली दृढ इच्छाशक्ती पाहिजे. सहा महिने एक क्षणभरही तीर्थंकरांच्या मनात संगमदेवाच्या दुष्कृत्याचा विचार नाही आला. तीर्थंकर केवळ शुक्ल ध्यानात मग्न असतात. शुक्ल ध्यान म्हणजे मनात अस्वस्थतेची जाणीव सुद्धा तयार होऊ न देणे. असे अनेक संगमदेव प्रवृत्ती त्यांच्या समोर आल्या. पण ते सगळ्या गोष्टी तितक्याच सहजतेने घेत. श्रीकृष्णाने ९९ वेळा शिशुपालाचे अपशब्द ऐकले नंतर त्याला शिक्षा केली. पण तीर्थंकराबाबत समोरच्याने केलेल्या दुष्कृत्यांची मोजदादच होत नाही. सुधर्मा स्वामी एकीकडे युद्धाची गोष्ट करतात आणि त्याचवेळी फुलाची चर्चा करतात. कारण युद्ध करताना व्यक्ती कठोर होतो, भले तो प्रत्युत्तर देत नसेल. पण तीर्थंकरांच्या आतील कमळाचे फूल कोमलच असते. ते कोणताही वार झेलतच नाही. जिथे गेल्याने आपली शांती भंग होऊ शकते तिथे जाऊच नका. तीर्थंकर कमळ आहेत. ते कधी कोमजत नाही, फुलतच राहते, मग कोणीही येऊ दे. आपले फुलणे समोरून कोण येतं यावर अवलंबून असते. योद्धा आणि क्षत्रिय वेगवेगळे असतात. क्षत्रिय म्हणजे जो रक्षण करतो. कमजोराची ताकद बनतो. तीर्थंकरांचे वचन ऐकताच समोरचा कितीही क्रोधी असो शांतच होतो. तीर्थंकराचा प्रभाव पडला म्हणूनच गोशालक अंतिम समयी आलोचना करतो. ’महावीर दवा दे और असर ना हो, वो दवा महावीर की है ही नहीं.’ रक्षा करण्यात तीर्थंकर श्रेष्ठतम आहेत. ही अनुभूती सुधर्मा स्वामींनी घेतलेली आहे. तीर्थंकरांचा साक्षात्कार त्यांना झाला. हीच विरत्थुई आहे. तीर्थंकरांचे तीर्थंकरत्व समजून घ्यायचे तर विरत्थुईच एकमेव मार्ग आहे. जो स्वतः अनुभव घेऊन बोलतो तेव्हा त्याच्या बोलण्यात अधिक ताकद असते.

**– उपाध्याय प्रवर पू.श्री. प्रविणऋषिजी म. सा.**

# गुणवंत लेकींच्या स्वप्नांना ‘बीबी मा’ शिष्यवृत्तीची भरारी

**न्यू इंग्लिश स्कूल, चिचोंडी पाटील येथे गुणवंत विद्यार्थिनींचा गौरव; प्रथम क्रमांकाच्या सृष्टी कराळेला १० हजारांचे पारितोषिक**



नगर – रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल, चिचोंडी पाटील येथे कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीनिमित्त विविध उपक्रमांसह गुणवंत विद्यार्थिनींच्या बक्षीस वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. स्वर्गीय शहानिजाम सय्यद यांच्या स्मरणार्थ ‘बीबी मा शैक्षणिक पुरस्कार २०२६’ अंतर्गत इयत्ता दहावीतील गुणवंत विद्यार्थिनींना शिष्यवृत्ती देऊन त्यांच्या शैक्षणिक यशाचा गौरव करण्यात आला.

कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे उपस्थित होते. तसेच सरपंच शरद पवार, रयत शिक्षण संस्थेच्या सदस्य आभा कोकाटे, अप्पा पवार, एन. एम. फाउंडेशनचे अध्यक्ष आरिफ नन्हे मिया सय्यद, शाहिद शहा निजाम सय्यद, जाहिद शहा निजाम सय्यद, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य, ग्रामस्थ, पालक, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

इयत्ता दहावीच्या परीक्षेत कु. कराळे सृष्टी विष्णू हिने ९३.२० टक्के गुणांसह प्रथम क्रमांक पटकावला. तिच्या उल्लेखनीय यशाबद्दल तिला १० हजार रुपयांचे प्रथम पारितोषिक देण्यात आले. कु. पवार शिवानी जालिंदर हिने ८८ टक्के गुणांसह द्वितीय क्रमांक मिळविला. तिला ७.५ हजार रुपयांचे द्वितीय पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.तर कु. कोकाटे भार्गवी संतोष हिने ८६.६० टक्के गुणांसह तृतीय क्रमांक मिळविला. तिच्या यशाबद्दल तिला ५ हजार रुपयांचे तृतीय पारितोषिक प्रदान करण्यात आले.

# बदनामी करण्याच्या उद्देशाने विरोधकांचे हिंद सेवा मंडळावर आरोप

### विरोधकांच्या आरोपांची वस्तुस्थिती सभासदांसमोर मांडणार : सुमतीलाल कोठारी

नगर – हिंद सेवा मंडळाच्या कारभाराबाबत विरोधकांकडून होत असलेल्या आरोपांचे खंडन संस्थेचे मानद सचिव सुमतीलाल कोठारी यांनी करून संस्थेची बदनामी करण्याच्या उद्देशाने विरोधक हिंद सेवा मंडळाच्या कारभारावर आरोप करत असून विरोधकांच्या आरोपांची वस्तुस्थिती सर्व सभासदांसमोर मांडणार आहोत, असा खुलासा केला आहे.

सचिव सुमतीलाल कोठारी यांनी पत्रक काढून संस्थेचे सभासद राजेंद्र चोपडा व माजी मानद सचिव सुनील रामदासी यांनी संस्थेच्या मागील सात-आठ वर्षांच्या कामकाजाबाबत केलेले आरोप निराधार असून, वैयक्तिक आकसापोटी व राजकीय भावनेने संस्थेच्या प्रशासकीय कामकाजात अडथळे निर्माण करून संस्थेची बदनामीचा प्रयत्न केला जात असल्याचे स्पष्ट केले आहे.संस्थेला शंभर वर्षांहून अधिक वर्षांची वैभवशाली परंपरा लाभली आहे. शैक्षणिक क्षेत्रात नावलौकिक असलेली आणि समाजात प्रतिष्ठा असलेली ही संस्था आहे. अशा संस्थेच्या कारभाराबाबत आरोप करताना विरोधकांनी संस्थेची प्रतिष्ठा, उपलब्ध कागदपत्रे आणि प्रत्यक्ष वस्तुस्थिती यांचा विचार करणे अपेक्षित आहे. संस्थेचे पदाधिकारी म्हणून अनेक वर्षे काम केलेल्या ज्येष्ठ सभासदांकडून असे बेजबाबदार वक्तव्ये आणि पत्रव्यवहार होऊन संस्थेच्या कामकाजात वारंवार अडथळे आणणे योग्य नव्हे, असे कोठारी यांनी स्पष्ट केले.

### चेंज रिपोर्टमधील त्रुटींची जबाबदारी ठरविताना इतिहास तपासावा

संस्थेच्या चेंज रिपोर्टबाबत प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी या विषयाचा संपूर्ण अभ्यास करणे आवश्यक आहे. सुनील रामदासी यांनी यापूर्वी संस्थेच्या मानद सचिवपदाची जबाबदारी सांभाळलेली असतानाही चेंज रिपोर्टसंदर्भात त्रुटी आणि अपूर्णतेचे प्रश्न उपस्थित करत आहेत. विशेषतः १९९८ पासूनच्या चेंज रिपोर्टसंदर्भातील अपूर्णतेचा मुद्दा प्रलंबित असून त्याबाबत न्यायालयीन प्रकीया चालू आहे.

### पदोन्नतीच्या प्रकरणातून संस्थेला वेठीस धरण्याचा प्रयत्न?

संस्थेतील कर्मचाऱ्यांना शासनाच्या नियमांनुसार पदोन्नती दिली आहे. मात्र त्यास विरोधकांनी अक्षेप घेत संस्थेवर आरोप केले आहेत. प्रत्यक्षात संस्थेचा कोणताही पदाधिकारी मनमानी पद्धतीने निर्णय घेऊ शकत नाही. पदोन्नती, नियुक्ती, पदावनती आणि इतर प्रशासकीय निर्णय हे शासनाचे नियम, पात्रता निकष आणि सक्षम प्राधिकरणांच्या मान्यतेनुसारच घेतले जातात. त्यामुळे प्रत्येक निर्णयाची कागदपत्रे तपासण्याऐवजी संपूर्ण संस्थेच्या कारभारावर आरोप करणे योग्य नाही, असे कोठारी यांनी सांगितले.

### नियुक्त्यांबाबत वेगवेगळे निकष का?

संस्थेचे नवनियुक्त अध्यक्ष, मानद सचिव आणि कार्याध्यक्ष यांच्या नियुक्त्यांबाबत राजेंद्र चोपडा व सुनील रामदासी यांनी प्रश्न उपस्थित केले आहेत. मात्र, तत्कालीन मानद सचिव अविनाश आपटे यांनी पदाचा राजीनामा दिल्यानंतर सुनील रामदासी यांची संचालक मंडळामार्फत मानद सचिव म्हणून नियुक्ती करण्यात आली होती. त्या वेळी संचालक मंडळामार्फत झालेल्या नियुक्तीची प्रक्रिया स्वीकारण्यात आली होती. मग सध्याच्या नियुक्त्यांबाबत प्रश्न उपस्थित करताना त्या वेळच्या प्रक्रियेचाही विचार केला पाहिजे, अशी भूमिका कोठारी यांनी मांडली. रामदासींची स्वतःच्या बाबतीत योग्य निकष आणि इतरांच्या बाबतीत चुकीचा, अशी भूमिका योग्य नाही. संस्थेच्या सर्व पदाधिकाऱ्यांसाठी नियम समान आहेत.

### संस्थेच्या मागील सात-आठ वर्षांतील विकासाकडे दुर्लक्ष कशासाठी?

मागील सात-आठ वर्षांत संस्थेच्या विविध शैक्षणिक विभागांमध्ये आणि प्रशासकीय कामकाजात झालेल्या प्रगतीचा विचार न करता सातत्याने आरोप केले जात आहेत. संस्थेतील शाळा, महाविद्यालये, रात्रशाळांच्या कारभारा बाबत कर्मचारी, विद्यार्थी आणि पालक यांच्याशी सातत्याने संबंधित विषयांवर संचालक मंडळाच्या नियमित मासिक सभांमध्ये चर्चा करून आडीअडचणी सोडवण्यासाठी निर्णय घेण्याचा प्रयत्न केला जातो. शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, प्रशासकीय कार्यक्षमता सुधारणे आणि संस्थेतील कामकाज अधिक सक्षम करणे यासाठी विद्यमान संचालक मंडळ प्रयत्नशील आहे. त्यामुळे संस्थेतील कर्मचारीवर्ग आनंदाने आणि समाधानाने काम करत आहेत. विरोधकांनी संस्थेच्या प्रगतीकडे दुर्लक्ष करून केवळ आरोप करणे योग्य नाही. संस्थेच्या कामकाजात काही कमतरता असतील, तर त्या दाखवून देऊन सुधारणा करण्यासाठी त्यांनी सहकार्य करावे. मात्र, संस्थेच्या विकासकामांबाबत कोणतीही वस्तुनिष्ठ चर्चा न करता केवळ नकारात्मक आरोप केले जात असतील, तर त्यातून संस्थेचे हित साधले जाणार नाही.

### विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या प्रश्नावर संस्थेची भूमिका स्पष्ट

विरोधकांनी विद्यार्थ्यांच्या लैंगिक सुरक्षेसंदर्भातील संवेदनशील मुद्दे उपस्थित केले आहेत. संस्थेच्या सर्व शाळा महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेला सर्वोच्च प्राधान्य दिले जात असून त्यासाठी सर्व पदाधिकारी कडक भूमिका घेत कठोर कारवाई करत आहे. श्रीरामपूरच्या शाळेच्या घटनेनंतर संबधित शिक्षकावर कडक कारवाई करून त्यास सेवामुक्त केले आहे. आणि संबंधित प्रकरणात पोलिसांनी अटकही केली होती. या घटनेनंतर संस्थेने आवश्यक प्रशासकीय कारवाई केली असल्याचे कोठारी यांनी स्पष्ट केले. संबंधित शिक्षकाची नियुक्ती संस्थेने थेट केलेली नसून, ती महाराष्ट्र शासनाच्या पवित्र पोर्टल प्रक्रियेद्वारे झालेली होती, असाही खुलासा केला आहे. तथापि, नियुक्ती कोणत्या प्रक्रियेद्वारे झाली, हा मुद्दा वेगळा आणि विद्यार्थ्यांच्या सुरक्षेचा प्रश्न वेगळा आहे. गंभीर तक्रार समोर आल्यानंतर संबंधित शिक्षकाविरुद्ध कारवाई करणे ही संस्थेची जबाबदारी आहे आणि संस्थेने ती पार पाडल्याचे कोठारी यांनी सांगितले.श्रीरामपूर येथील आणखी एका प्रकरणाबाबत विरोधकांनी आरोप केले आहेत. ते प्रकरण संस्थेच्या शाळेतील नसले, तरी संबंधित शिक्षकाविरुद्ध चौकशी पूर्ण होईपर्यंत त्याच्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आली आहे. या घटनांबाबत संस्थेने काहीच कारवाई केली नाही, अशा स्वरूपाचे चित्र निर्माण करणे योग्य नाही. विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेच्या बाबतीत संस्था आवश्यक ती पावले उचलण्यास सक्षम आहे, असे कोठारी यांनी स्पष्ट केले.

### आर्थिक व्यवहारांबाबत आरोप नव्हे, पुरावे महत्त्वाचे

संस्थेच्या आर्थिक व्यवहारांबाबत अनेक प्रकारचे आरोप करण्यात आले आहेत. मात्र, या आरोपांच्या समर्थनार्थ कोणती कागदपत्रे किंवा ठोस पुरावे सादर करण्यात आले आहेत का?, याची स्पष्टता आवश्यक आहे. कोणत्याही आर्थिक व्यवहाराबाबत शंका असल्यास संबंधित नोंदी, लेखापरीक्षण अहवाल आणि आर्थिक विवरणांच्या आधारे त्याची पडताळणी केली जाऊ शकते. हिंद सेवा मंडळाच्या आर्थिक व्यवहारांचे लेखापरीक्षण करण्यासाठी अहिल्यानगरमधील अनुभवी आणि नामांकित लेखापरीक्षण संस्थेची नियुक्ती करण्यात आली आहे. दरवर्षी वार्षिक सर्वसाधारण सभेत वार्षिक अहवालाद्वारे आर्थिक व्यवहारांचा लेखाजोखा सभासदांसमोर मांडला जातो आणि त्यावर नियमानुसार चर्चा व निर्णय होवून मंजुरी मिळते. हे चोपडा व रामदासी यांना माहित नाही का? हिंदसेवा मंडळामध्ये, जी शिक्षक भरती झालेली आहे ती सन २०१३ ते २०१८ या कालावधीत झालेली आहे त्यानंतर हिंदसेवा मंडळामध्ये कार्यकारिणीने कोणतीही शिक्षक भरती केलेली नाही व जी भरती झालेली आहे ती पोर्टल मार्फत अनियमित भरती झालेली आहे. त्याची चौकशी शासनाने करावी.

### सभासद आणि कर्मचाऱ्यांना सन्मानाची वागणूक ही संस्थेची परंपरा

संस्थेच्या कार्यालयात येणाऱ्या आजीव सभासदांना, कर्मचाऱ्यांना आणि इतर संबंधितांना सन्मानपूर्वक वागणूक देणे ही कोणत्याही शैक्षणिक व धर्मादाय संस्थेची मूलभूत संस्कृती आहे. हिंद सेवा मंडळातही या परंपरेचे पालन केले जात आहे. संस्थेचे सर्व पदाधिकारी आणि सर्व संचालक संस्थेच्या कार्यालयात येणाऱ्या सभासदांशी आणि कर्मचाऱ्यांशी सन्मानाने वागण्यावर भर देतात. संस्थेचे कामकाज हे परस्पर आदर, सहकार्य आणि जबाबदारीच्या भावनेतून चालले पाहिजे. या विषयावर कोणाला काही तक्रार असल्यास त्यांनी विशिष्ट घटना आणि संबंधित तथ्यांसह आपली भूमिका मांडावी. संस्थेच्या कामकाजाबाबत जाहीरपणे आरोप करण्याऐवजी वस्तुनिष्ठ माहितीच्या आधारे चर्चा होणे आवश्यक आहे, असे कोठारी यांनी स्पष्ट केले.

### संस्थेची बदनामी करण्याऐवजी वस्तुस्थिती सभासदांसमोर मांडावी

हिंद सेवा मंडळाशी अनेक वर्षांपासून विद्यार्थी, पालक, शिक्षक, कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि आजीव सभासद जोडलेले आहेत. संस्थेने समाजात निर्माण केलेली प्रतिष्ठा ही अनेक पिढ्यांच्या योगदानातून उभी राहिली आहे. त्यामुळे संस्थेच्या कारभाराबाबत प्रश्न उपस्थित करताना प्रत्येकाने जबाबदारीने वागणे आवश्यक आहे. संस्थेच्या कामकाजाबाबत शंका किंवा तक्रार असल्यास संबंधितांनी संस्थेची घटना, ठराव, आर्थिक नोंदी, लेखापरीक्षण अहवाल आणि लागू कायदेशीर प्रक्रिया यांचा आधार घ्यावा. पुराव्यांच्या आधारे प्रश्न उपस्थित करण्याचे स्वागत आहे; मात्र अपूर्ण माहितीच्या आधारे आरोप करून संस्थेबद्दल गैरसमज निर्माण करणे टाळले पाहिजे. संस्थेविरोधात वरिष्ठ प्रशासकीय पातळीवर तक्रारी सादर करताना त्यातील माहितीची सत्यता तपासणे आवश्यक आहे. अन्यथा संस्थेच्या कामकाजाबरोबरच शासकीय अधिकाऱ्यांचा वेळ आणि ऊर्जा देखील अनावश्यकपणे खर्च होऊ शकतो. संबंधित तक्रारींची वस्तुस्थिती आणि त्यामागील पार्श्वभूमी योग्य वेळी सभासदांसमोर मांडली जाईल, असे कोठारी यांनी सांगितले.

### विरोधकांच्या आरोपांना घाबरत नाही; गरज पडल्यास पत्रकार परिषद

हिंद सेवा मंडळाच्या कारभाराबाबत करण्यात आलेल्या आरोपांना विद्यमान संचालक मंडळ घाबरत नाही. संस्थेच्या कामकाजासंबंधी प्रत्येक प्रश्नाला नियम, कागदपत्रे आणि वस्तुस्थितीच्या आधारे उत्तर देण्याची आमची तयारी आहे. संस्थेची प्रतिष्ठा जपतानाच पारदर्शकता आणि शैक्षणिक गुणवत्ता वाढविण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. गरज पडल्यास सविस्तर पत्रकार परिषद घेऊन संबंधित आरोपांचे खंडन केले जाईल आणि सर्व वस्तुस्थिती सभासदांसमोर मांडली जाईल, असे सुमतीलाल कोठारी यांनी स्पष्ट केले.

संस्थेच्या हितासाठी सभासदांनी वस्तुस्थितीची पडताळणी करून सहकार्य करावे आणि संस्थेच्या शैक्षणिक कार्यात अडथळे निर्माण होणार नाहीत, याची काळजी घ्यावी, असे आवाहनही त्यांनी केले.



‘ब्रिक्स पारंपारिक व देशी खेळ २०२६’ या आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी महाराष्ट्रातील योगासन खेळातील १५ खेळाडूंच्या संघाची निवड झाली.

# ‘ब्रिक्स पारंपारिक व देशी खेळ २०२६’ साठी ‘महाराष्ट्र योगासन खेळाडूंचा’ संघ रवाना

नगर – युवा कार्य आणि क्रीडा मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित ब्रिक्स (BRICS) पारंपारिक व देशी खेळ २०२६’ या आंतरराष्ट्रीय क्रीडा महोत्सवात भारताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी महाराष्ट्रातील योगासन खेळातील १५ खेळाडूंच्या संघाची निवड झाली असून सदर संघ अहमदाबाद, गुजरात येथे प्रात्यक्षिक सादर करण्यासाठी रवाना झाला आहे. ब्रिक्स अंतरराष्ट्रीय बैठकीच्या माध्यमातून खेळाडूंना आपले क्रीडाकौशल्य प्रदर्शित करण्याची संधी महाराष्ट्रातील योगासन संघास प्राप्त झाली आहे.

सदर संघाचे प्रशिक्षण शिबीर अहिल्यानगर जिल्ह्यात ७ ते १० ऑक्टोबर रोजी यशस्वीरित्या पार पडले असून खेळाडूंच्या सहभागामुळे जिल्ह्याच्या क्रीडा क्षेत्राला नवी दिशा मिळण्यास मदत होणार आहे. सदर संघात अहिल्यानगर जिल्ह्यातील आर्यन खरात, प्रणव साहू, अंश मयेकर, रोहन तायडे, तृप्ती डोंगरे, रुद्राक्षी भावे, प्रांजळ व्हेन्ना, देवांशी वाकळे या खेळाडूंची निवड झाली असून त्याचबरोबर पुण्यातील आयुष महातो, अरविंद सबावत, तन्वी रेड्डीज, अश्विका हिंगे, निरल वाडेकर, तसेच नागपूर जिल्ह्यातील यदनेश वानखेडे, खुश इंगोले अशा एकूण १५ खेळाडूंची निवड झालेली असून त्यांच्याबरोबर चंचल माळी – राज्य क्रीडा मार्गदर्शक जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, जळगाव यांची संघ प्रशिक्षक म्हणून तसेच अहिल्यानगर जिल्हा योगासन संघटनेचे सचिव उमेश झोटिंग यांची संघ व्यवस्थापक म्हणून निवड झालेली आहे. अहमदाबाद, गुजरात येथे होणाऱ्या या संघाच्या कामगिरीकडे अहिल्यानगर जिल्ह्यातील तसेच पूर्ण देशातील क्रीडाप्रेमींचे लक्ष लागले आहे.

अहमदाबाद येथे १२ ऑक्टोबर रोजी होणाऱ्या प्रात्यक्षिकासाठी महाराष्ट्र योगासन संघटना तसेच आशियन योगासन संघटनेचे अध्यक्ष डॉ. संजय मालपाणी तसेच अहिल्यानगर जिल्ह्याचे जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे यांच्या वतीने सहभागी खेळाडूंना त्यांच्या उत्कृष्ट कामगिरीसाठी शुभेच्छा देण्यात आल्या.



### पितृ पंधरवड्यानिमित्त आधार आपुलकी फाउंडेशनचा आप्तभोजन उपक्रम

नगर आधार आपुलकी फाउंडेशनच्या वतीने सर्वपित्री अमावस्येनिमित्त युवान संस्थेतील युवा अंकुरांसाठी आप्तभोजनाचा उपक्रम राबविण्यात आला. या उपक्रमाचे हे सलग तिसरे वर्ष असून, अन्नदानासोबतच प्रेम, आपुलकी आणि माणुसकीची नाती जपण्याचा सुंदर संदेश या माध्यमातून देण्यात आला. या उपक्रमामुळे केवळ अन्नदान होत नाही, तर आजी-आजोबा आणि नातवंडे यांच्यातील जिव्हाळ्याचे नातेही अधिक दृढ होते. या प्रसंगी युवान संस्थेचे संस्थापक संदीप कुसळकर, सचिव सुरेश मैड, समाजकल्याण अधिकारी श्री. मुरकुटे तसेच आधार आपुलकी फाउंडेशनचे आजी-आजोबा उपस्थित होते.

